दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
गुरुवार, दि. ०४ जून २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# शेतकऱ्यांना कर्जमाफी की 'शब्दछल'?

## योजनेवरून विरोधक आक्रमक; जाचक अटींमुळे ५०% शेतकरी लाभापासून वंचित राहण्याचा आरोप

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील महायुती सरकारने जून महिन्याच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला असला, तरी या योजनेतील अटी व शर्तींवरून आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि शेतकरी संघटनांनी या योजनेला 'फसवी' आणि 'शेतकऱ्यांची क्रूर थट्टा' असल्याचे संबोधले असून, संपूर्ण सात-बारा कोरा करण्याची मागणी लावून धरली आहे.

सरकारने २ लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यामध्ये काही अटी घातल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह नियमित कर्ज भरणाऱ्यांना देखील सरकारकडून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. मात्र या निर्णयाला राजकीय वर्तुळात आगामी निवडणुकांशी जोडले जात असून, विरोधकांनी याला 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणेच केवळ निवडणुकीचा देखावा असल्याचे म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी योजना हा निव्वळ देखावा आहे. या योजनेमध्ये शब्दछल करून नियम, अटी व शर्ती टाकून जवळपास ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना या योजनेतून जाणीवपूर्वक बाहेर ठेवलेले आहे. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असून सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

### अटींमुळे रोषाचा भडका; अकोल्यात आदेशाची होळी

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे महात्मा फुले चौकात किसान सभेने शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाविरोधात संताप व्यक्त करत शासन आदेशाची होळी केली. या निकषांच्या आड खऱ्या गरजू शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्याचा आरोप करत, शासनाने सर्वांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी आणि अटी रद्द कराव्यात अशी मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास सरकारच्या कर्जमाफी निर्णयाविरोधात राज्यभर आंदोलन केले जाईल, असा इशाराही किसान सभेने दिला आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, ही कर्जमाफी केवळ १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या काळातील थकीत कर्जासाठी आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज त्याआधीपासून थकीत आहे आणि ज्यांना नवीन पीककर्ज मिळू शकलेले नाही, अशा मोठ्या वर्गाला यातून वगळण्यात आले आहे. सरकारची ही योजना फक्त पीककर्ज आणि पुनर्गठित कर्जापुरती मर्यादित आहे. ज्या शेतकऱ्यांनी विहीर, पाईपलाईन किंवा पशुपालनासाठी कर्ज घेतले आहे, त्यांना या योजनेचा कोणताही फायदा होणार नाही. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचा लाभ मिळवण्यासाठी २०२६-२७ पर्यंत कर्ज घेऊन ते वेळेत भरण्याची अट घालण्यात आली आहे, जी पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# ममतांची TMC फुटली, ५८ आमदारांनी वेगळा गट तयार केला

### ऋतब्रत बॅनर्जी विधिमंडळ पक्षाचे नेते घोषित, २ दिवसांपूर्वी पक्षातून काढले होते

कोलकाता (दै. संध्या)

पश्चिम बंगालमध्ये ममतांच्या टीएमसीमध्ये फूट पडली आहे. सोमवारी पक्षातून काढण्यात आलेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना 58 बंडखोर आमदारांनी विधिमंडळ पक्षाचे नेते घोषित केले. बुधवारी विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांची भेट घेऊन समर्थन पत्रही सादर केले. बंगालमध्ये झालेल्या निवडणुकीत टीएमसीने 80 जागा जिंकल्या होत्या. 58 आमदारांच्या बंडखोरीनंतर आता ममतांकडे फक्त 22 आमदार उरले आहेत. तरीही, बंडखोर गटाने आपल्या पत्रात ममता बॅनर्जी यांना अजूनही पक्षाध्यक्ष म्हटले आहे. पण ते अभिषेक बॅनर्जींचे नेतृत्व आणि विधिमंडळ पक्षाशी संबंधित निर्णय स्वीकारत नाहीत. सोमवारी अभिषेक बॅनर्जींच्या लेटर हेडवर अध्यक्षांना पाठवलेल्या पत्रात शोभनदेव यांना विरोधी पक्षनेते बनवण्याचा प्रस्ताव पाठवला होता. आमदार संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांनी तक्रार केली होती की या प्रस्तावावरील त्यांच्या सह्या बनावट आहेत. तक्रारीनंतर ममतांनी दोन्ही आमदारांना पक्षातून निलंबित केले होते.

ममता बॅनर्जी यांनी टीएमसीमधून 2 आमदार संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांना पक्षातून काढून टाकले होते. दोघांनी अध्यक्षांकडे तक्रार केली होती की, पक्षाने शोभनदेव यांना विरोधी पक्षनेता बनवण्याच्या प्रस्तावावर त्यांच्या खोट्या सह्या केल्या होत्या. साहा आणि बॅनर्जी यांचा आरोप आहे की, ही तक्रार केल्यामुळेच दोघांना टीएमसीमधून काढण्यात आले. दोन तृतीयांश आमदार भाजपमध्ये सामील व्हावेत. टीएमसीच्या एकूण 80 आमदारांपैकी दोन तृतीयांश (54 आमदार) भाजपमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतील. अशा परिस्थितीत पक्षांतरबंदी कायदा लागू होणार नाही. मात्र, भाजपने नकार दिला आहे. टीएमसीचे 2 गट पडतील. एक गट पक्षापासून वेगळा होऊन 'खरी टीएमसी' असल्याचा दावा करेल. यासाठीही 54 आमदारांच्या पाठिंब्याची गरज असेल. असे झाल्यास, मोठ्या गटाच्या दाव्यावर निवडणूक आयोग निर्णय घेईल.

# 'माझा श्वास तुमच्याकडे गहाण टाकून मुंडे साहेब गेले' : पंकजा मुंडे

बीड (दै. संध्या)



लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या आज असलेल्या स्मृती दिनानिमित्त परळीतील गोपीनाथ गडावर भजन आणि कीर्तनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात भारूड गाताना पंकजा मुंडे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले, ज्यानंतर त्यांनी गडावर मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांशी मनमोकळा संवाद साधला. पंकजा मुंडे म्हणाल्या, तुम्ही 12 वर्षे झाले तरी माझ्या वडिलांसाठी घाम गाळत आहात. मुंडे साहेबांनी काही आपल्या घरात सोन्याचे पोते आणून नव्हते ठेवले. पण मुंडे साहेबांनी आपल्या रक्तात, आपल्या धमण्यांमध्ये स्वाभिमान भरला आहे. त्यामुळे आपण मुंडे साहेबांना कधीच विसरू शकत नाही. जाती धर्माच्या सगळ्या भिंती पाडून ज्यांच्यासाठी अश्रू गाळले आजच्या दिवशी सबंध देशातल्या लोकांनी त्या मुंडे साहेबांचे आणि त्या लोकांच्या अश्रूचे आणि आमचे नाते रक्ताच्या नात्यापेक्षा श्रेष्ठ नाही का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. पुढे बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, जेवढे प्रेम तुम्ही मुंडे साहेबांवर करतात, तेवढे मी कर्जबाजारी होते. कारण माझा श्वास तुमच्याकडे गहाण टाकून मुंडे साहेब स्वर्गाला गेले आहेत. कारण मुंडे साहेबांना जेवढे तुम्ही प्रेम करता तेवढे तुमचे जोडे उचलण्याची क्षमता माझ्यात येते. तुमच्यासाठी कष्ट करण्याची क्षमता माझ्यामध्ये येते. मला या जीवनात तुमच्या प्रेमापेक्षा, तुमच्या सन्मानापेक्षा कुठलीच संपत्ती मोठी नाही, हे मी मुंडे साहेब आणि वैद्यनाथाची शपथ घेऊन सांगते. पंकजा मुंडे पुढे भावनिक होत म्हणाल्या, 3 जूनचा दिवस सोपा वाटतो, पण 2 जूनची रात्र मात्र फार फार कठीण असते. मी माझी आई, प्रीतम ताई आणि माझे दोन्ही लेकरं आम्ही काल रात्री इथे बसलो होतो आईजवळ. आई सतत रडत होती, एक टर्म तरी साहेबांना मिळायला पाहिजे होती, 5 वर्ष तरी साहेब जगायला पाहिजे होते. इतके कष्ट घेतले, पायात काटे रुतले, घाबरले नाही, उन्हात फिरले, खाल्ले नाही, जेवले नाही.

# हुंड्यासाठी छळ, अन् गर्भपाताची सक्ती

## अखेर २५ वर्षीय विवाहितेने संपवले जीवन, पतीसह सासू-सासऱ्यावर गुन्हा दाखल

पुणे (दै. संध्या)



पुण्यातील चंदननगर परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. चारचाकी गाडी, फ्लॅट खरेदीसाठी पैसे आणि सोन्याच्या अंगठीची मागणी करत सासरच्या मंडळींनी केलेल्या सततच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून २५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. तेजस्विनी गोरख सोनवणे असे आत्महत्या केलेल्या दुर्दैवी विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी पुण्यातील चंदननगर पोलीस ठाण्यात मृत विवाहितेच्या पतीसह सासू आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत तेजस्विनीचे वडील शामराव बाळासाहेब गवळी (वय-५२, धंदा-शेती, रा. मासावाडी रोड, नवीन वांगदरी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी खालील आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गोरख संभाजी सोनवणे (वय-३२ वर्षे - पती) संभाजी लक्ष्मण सोनवणे (वय-६२ वर्षे - सासरा) अलका संभाजी सोनवणे (वय-५५ वर्षे - सासू) पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस्विनीचा विवाह २५ जून २०२० रोजी गोरख संभाजी सोनवणे याच्याशी झाला होता. लग्नानंतर सुरुवातीला तिला सासरच्यांनी चांगली वागणूक दिली. त्यांना 'विरा' (वय अडीच वर्षे) नावाची एक लहान मुलगी आहे. मात्र, मुलगी झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी तेजस्विनीचा छळ करण्यास सुरुवात केली. पती गोरख याने कार घेण्यासाठी माहेरहून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केली. पैसे आणण्यास नकार दिल्याने तिला बेदम मारहाण व मानसिक त्रास देण्यात आला. जुलै २०२२ मध्ये पतीने तिला माहेरी आणून सोडले आणि 'पैसे असतील तरच पाठवा, नाहीतर पाठवू नका" अशी तंबी दिली. नंतर नातेवाईकांच्या मध्यस्थीने ती पुन्हा सासरी गेली. २८ नोव्हेंबर २०२३ रोजी तेजस्विनीला मुलगी झाली. त्यावेळी सासरच्यांनी डिलिव्हरीचा खर्च देण्यास स्पष्ट नकार दिला. अखेर तिच्या वडिलांनी १ लाख रुपयांची रोकड आणून दवाखान्याचे बिल भरले. त्यानंतर जून २०२४ मध्ये तेजस्विनी पुन्हा गरोदर राहिली असता, पती गोरख याने तिला माहेरी आणून सोडले आणि 'हिला आधी मुलगी झाली आहे, तुम्ही आता मुलगा की मुलगी हे चेक करा आणि मुलगा असेल तरच आमच्याकडे आणून सोडा"असा अमानुष पवित्रा घेतला. या प्रचंड मानसिक तणावामुळे तेजस्विनीचा स्वतःहून गर्भपात (अबॉर्शन) झाला. मे २०२६ मध्ये 'अधिक मास' असल्याने तेजस्विनीच्या वडिलांनी जावई आणि व्याहींना जेवणासाठी बोलावले होते. मात्र, 'आम्हाला सोन्याची अंगठी दिली तरच जेवायला येऊ, नाहीतर येणार नाही,' असा हट्ट गोरखने धरला. अखेर ते जेवायला आले, पण तेथेही रागाच्या भरात त्यांनी तेजस्विनीला मारहाण करत शिवीगाळ केली. दिनांक २ जून २०२६ रोजी रात्री १० वाजता पती गोरख याने तेजस्विनीच्या वडिलांना फोन करून सांगितले की, 'तेजस्विनीने आतून दरवाजा लावून घेतला असून ती दार उघडत नाही.'

त्यानंतर काही वेळातच तेजस्विनीचे मामा दत्तात्रय बापूराव दाते यांनी फोन करून सांगितले की, तेजस्विनीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. तिला तातडीने पुण्यातील मनिपाल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

### फ्लॅटसाठी ३ लाख आणि 'अधिक मासात' सोन्याच्या अंगठीची मागणी

एप्रिल २०२६ मध्ये पती गोरख याला फ्लॅट खरेदी करायचा होता, ज्यासाठी त्याने तेजस्विनीकडे ३ लाख रुपयांची मागणी केली. तिने नकार दिला असता, तिला मारहाण करून माहेरच्या लोकांशी संपर्क तोडण्यास भाग पाडले गेले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




### स्वच्छतागृहे, चेंजिंग रूम, प्रकाशयोजनांसह सीसीटीव्ही सुविधा अनिवार्य

# महिला खेळाडूंसाठी स्वच्छतागृहांची सुविधा

मुंबई (दै. संध्या)



उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे निर्देश

महाराष्ट्रातील महिला खेळाडू विविध क्रीडा प्रकारांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यांना अधिक सुरक्षित, सन्मानजनक आणि प्रोत्साहनपर वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील क्रीडांगणांच्या विकासासोबतच प्रत्येक क्रीडांगणावर मॉडेल स्वच्छतागृहे, पुरेशी प्रकाशयोजना, स्वतंत्र चेंजिंग रूम आणि सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत राज्यस्तरीय एकसंध धोरण तयार करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा क्रीडामंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. सन २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नावरील आश्वासनाच्या अनुषंगाने सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार चित्रा वाघ, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल(दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा व युवक सेवा विभागाचे आयुक्त दीपक सिंगला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्यावतीने विविध योजना राबविण्यात येत आहेत. महिलांना सुरक्षित आणि सक्षम वातावरण मिळावे यासाठी आवश्यक त्या सुविधा व तरतुदी करण्यात येत आहेत. क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा, दर्जेदार प्रशिक्षण व्यवस्था, आर्थिक पाठबळ, पोषण, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सुरक्षित वातावरण आणि सामाजिक स्वीकार या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या. महाराष्ट्र शासनाने क्रीडा क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्याचा निर्धार केला असून नव्या क्रीडा धोरणाद्वारे खेळाडूकेंद्रित दृष्टिकोन स्वीकारला आहे. ग्रामीण भागापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिला खेळाडूंना क्रीडांगणांवर आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांच्या सहभागात आणि कामगिरीत अधिक सुधारणा होईल.राज्यातील सर्व क्रीडांगणांवर महिला खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी एकसूत्रता राखत संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, तसेच याबाबत कृती आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिले.

बैठकीत राज्यातील क्रीडांगणांवरील महिला खेळाडूंसाठीच्या मूलभूत सुविधांची सद्यस्थिती, आवश्यक सुधारणा आणि भविष्यातील नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.




# महायुतीचे सर्व १७ उमेदवार विजयी होतील

### भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

मुंबई (दै. संध्या)

विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे सर्वच्या सर्व 17 अधिकृत उमेदवार विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी व्यक्त केला. महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी श्री.चव्हाण यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी या महायुतीच्या घटक पक्षांतर्फे घेण्यात आलेल्या या संयुक्त पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, शिवसेना नेते राहुल शेवाळे, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार उत्तम प्रकारे काम करत असताना राज्यात महायुतीचे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदशनाखाली घोडदौड करत आहे. शेतकरी, कष्टकरी या वर्गाच्या हिताचे निर्णय धडाक्याने घेतले जात आहेत. त्यामुळे 18 जून रोजी होणारी विधान परिषदेची निवडणूक महायुतीतर्फेच लढण्याचा निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी या जागांबाबत एकत्र बसून चर्चा केली आणि जागांचे वाटपही केले. या नेत्यांनी जाहीर केलेल्या अधिकृत उमेदवारांना निवडून देण्याच्या सूचना महायुतीच्या संबंधित मतदारांना देण्यात आल्याचे श्री. चव्हाण यांनी सांगितले.या निवडणुकीत अनेक वर्षे काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांनीही उमेदवारी अर्ज भरले आहेत. बंडखोरी करत कुणी अर्ज भरले असतील त्यांनी वरिष्ठांशी बोलून आपले अर्ज मागे घ्यावेत. त्यांच्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा निर्णय कालच्या बैठकीत झाल्याचे चव्हाण म्हणाले.यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे म्हणाले, महायुतीतर्फे समन्वय साधत सर्वांना सामावून घेण्याची भूमिका घेण्यात आली आहे. महायुतीच्या 17 अधिकृत उमेदवारांना पहिल्या पसंतीचे मत देण्याचे आवाहन त्यांनी संबंधित महापालिकांचे नगरसेवक, पंचायत समितीचे सभापती आणि नगर पंचायतीच्या नगरसेवकांना केले. उद्या उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने त्यानंतर महायुतीचे केवळ अधिकृत उमेदवार रिंगणात राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.ज्या कार्यकर्त्यांनी अर्ज भरले आहेत त्यांच्याशी एकनाथ शिंदे यांनी चर्चा केली असून त्यांच्या कार्याचा सन्मान केला जाईल. त्यामुळे महायुतीचेच सर्व उमेदवार निवडून येतील, असे राहुल शेवाळे यांनी ठामपणे सांगितले.

# संपादकीय

# वर्ल्ड सेंट्रल किचन-गाझात निम्माच स्वयंपाक!

युद्धस्य कथा रम्य- असं आपण नेहमीच म्हणतो. युद्धातला थरार, लष्करी कारवाया, त्यात होणारी जीवित आणि इतर हानी, राजकीय वार-पलटवार याबाबत नेहमी वाचायला मिळतं. पण या सगळ्याच्या मागे युद्धभूमीवर अनेक गोष्टी सुरू असतात. युद्धात विस्थापित झालेल्या, युद्धाची झळ बसलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी अनेक मानवतावादी संस्थाही मोठ्या प्रमाणात काम करत असतात. अशीच एक संस्था म्हणजे वर्ल्ड सेंट्रल किचन. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमध्ये पोळलेल्या लोकांना दररोज गरम, ताजं आणि पौष्टिक जेवण मिळावं यासाठी ही संस्था २०१० पासून काम करते. मात्र, एका युद्धाची झळ जशी तिथल्या स्थानिक नागरिकांना बसते तशी ती उर्वरित जगालाही बसते, याचा अनुभव इराण-इस्रायल-अमेरिका युद्धाच्या निमित्ताने सगळेच घेत आहेत. इराण-इस्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धामुळे संपूर्ण जग इंधन तुटवड्याचा सामना करत आहे. वर्ल्ड सेंट्रल किचनही त्याला अपवाद नाही. महाग झालेल्या इंधनामुळे यापुढे गाझामधील लोकांसाठी केलं जाणारं गरम जेवण निम्म्यावर आणायचा कठोर निर्णय या किचनने नुकताच घेतला आहे. या निर्णयामुळे गाझातील नागरिक दुःखात आहेत, युद्धामुळे आयुष्याची घडी विस्कटलेली असताना किमान दोन वेळचं गरम जेवण तरी आम्हाला विनासायास मिळत होतं, आता किचनने घेतलेल्या या निर्णयामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ येईल.. ते युद्धापेक्षा भयंकर असेल, असं गाझातील नागरिक म्हणत आहेत. गाझात युद्ध सुरू झाल्यापासून वर्ल्ड सेंट्रल किचनकडून दररोज सुमारे एक कोटी लोकांसाठी गरम, ताजा, पौष्टिक स्वयंपाक केला जातो. या जेवणाची पाकिटं गरम असतानाच जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावीत यासाठी या किचनमध्ये काम करणारे कर्मचारी आणि स्वयंसेवक जिवाचं रान करतात. मात्र, आता इंधनाचे भाव गगनाला भिडल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्वयंपाक करणं परवडणार नाही, त्यामुळे हे प्रमाण निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गाझातील लोकांची जेवणाची गरज अजिबात कमी झालेली नाही, उलट आमच्यासमोरील अडचणी आणि मर्यादांमुळे अक्षरशः मनावर दगड ठेवून हा निर्णय घेत आहोत, असं या किचनचे संस्थापक आणि अमेरिकन-स्पॅनिश शेफ जोस अँड्रेस यांनी नुकतंच स्पष्ट केलं आहे. २०१० मध्ये हैतीमध्ये झालेल्या महाप्रचंड भूकंपाची



दृश्यं बातम्यांमध्ये पाहत असताना, आजारी लोकांसाठी डॉक्टर पोहोचवले जातात, मग उपासमारीने तळमळणाऱ्या लोकांसाठी त्यांना जेऊ घालणारे व्यावसायिक 'शेफ' का पाठवायचे नाहीत, या विचारातून जोस अँड्रेस आणि त्यांची पत्नी पॅट्रिशिया यांनी या किचनची स्थापना केली. त्यात व्यावसायिक शेफ्स आणि स्वयंसेवक यांची नियुक्ती करण्यात आली. भूकंप, महापुरासारख्या नैसर्गिक आपत्ती किंवा युद्धासारख्या मानवनिर्मित आपत्तीच्या काळात कसं काम करावं, मोठ्या प्रमाणात स्वयंपाक कसा करावा, तो जास्तीत जास्त गरजूंपर्यंत कमीत कमी वेळेत कसा पोहोचवावा याचं प्रशिक्षणही या सगळ्यांना दिलं जातं. गाझा पट्टीत युद्ध सुरू झाल्यापासून वर्ल्ड सेंट्रल किचन तिथे जेवणाची सुमारे एक कोटी पाकिटं तयार करत आहे. आता वाढत्या महागाईमुळे ही संख्या ५० लाखांवर आणण्याचा निर्णय या किचनकडून घेण्यात आला आहे. एका बाजूला गाझातल्या नागरिकांना बॉम्बहल्ले आणि भूसुरुंगांपासून स्वतःला वाचवायचं आहेच, तर दुसरीकडे आता हाता-तोंडाची लढाईही लढायची आहे.

## संस्कृत सुभाषित

वस्त्रहीनस्त्वलंकारो, घृतहीनं च भोजनम्। स्तनहीना च या नारी, विद्याहीनं च जीवितम्।।

अर्थ – भोजनामध्ये तूप नसेल तर, उत्तम वस्त्रे नसतील तर सोन्याचांदीचे अलंकार पुष्ट स्तनाशिवाय स्त्री शोभत नाही. तसेच विद्याहीन माणसाचे आयुष्यही व्यर्थ असते.

## गुरु वचन

### इच्छाशक्तीच्या बळावर जगही जिंकता येते

केवळ सव्वा वर्षांची असताना मेंदुज्वरामुळे दृष्टी आणि ऐकण्याची क्षमता गमावलेली एक मुलगी आज जगविख्यात लेखिका म्हणून नावारूपाला आली आहे. तुम्हाला हा चमत्कार वाटत असेल तर, त्याची जनकही हीच मुलगी आहे. हेलेन केलर असे या मुलीचे नाव.

आपल्या केवळ इच्छाशक्तीच्या बळावर तिने आपल्या कठीण मानल्या जाणाऱ्या आजारालाही नियंत्रित केले. ज्या वयात तिचे खेळायचे–बागडायचे दिवस होते, त्या वयात तिच्या पुढ्यात केवळ अंधार होता.

आजारामुळे तिला सुरुवातीला नैराश्य आले होते. तिच्या पालकांनी मग तिची जबाबदारी एनी सुलियन यांच्याकडे सोपवली. अगदी ब्लॅक चित्रपटात अमिताभ ज्या पद्धतीने राणी मुखर्जीला स्पर्शाची भाषा शिकवतो. अगदी त्याच पद्धतीने एनीने हेलेनला स्पर्शाची भाषा शिकवली.

यानंतर एनीने तिला भाषा शिकवण्यासाठी जिवाचे रान केले. तिला प्रथम हाताने भाषा शिकवत शब्दांचे अर्थ तिला समजावले. यानंतर हेलरच्या मनात नवीन उमेद जागी झाली. हेलरने यानंतर कधीही मागे वळून पाहायचेच नाही हे ठाम केले.

तिच्यात एक अशी ऊर्जा निर्माण झाली, की या ऊर्जेने तिला नवीन दृष्टी दिली, आणि ही ऊर्जा होती तिच्या इच्छा शक्तीची. या बळाच्या आधारेच तिने रेडक्लिफ महाविद्यालयातून आपली पदवी मिळवली. या दरम्यान हेलेनचे पहिले पुस्तक 'द स्टोरी ऑफ लाईफ' प्रकाशित झाले. यानंतर याचे जवळपास ५० भाषांमध्ये या पुस्तकाचे भाषांतर करण्यात आले.

इथे हेलन यांच्या केवळ इच्छाशक्तीचाच विजय झाला. त्यांनी बालपणातच जर हार मानली असती तर जगाला इतकी प्रतिभाशाली लेखिका मिळालीच नसती. म्हणूनच केवळ इच्छाशक्तीच्या बळावरच आपण विजय मिळवू शकतो हे विसरता कामा नये.

## उपदेशकथा

### काटकसर

ही गोष्ट आहे १९४३ मधली. तेव्हा पुण्याच्या आगाखान पॅलेस मध्ये महात्मा गांधीजी स्थानबद्ध होते. तेथे गांधीजींसह त्यांची नात मनुबेनही होती. मनुबेनला तेव्हा अभ्यासाला एक वही हवी होती. म्हणून तिने कारागृहाच्या अधिकाऱ्यांकडून एक वही मागवून घेतली. ती वही जेव्हा गांधीजींनी पाहिली तेव्हा ते रागावले तिच्यावर! ते म्हणाले, 'मनू अभ्यास करायलाही एवढ्या पक्क्या बांधणीची अन् दीड रुपयाची महाग वही कशाला ग हवी? हे बघ, हे पैसे काही विलायतेहून नाही येत. आपले भारतीय लोकच जो कर भरतात ना. त्यातूनच खर्च होत असतो हा सगळा! तेव्हा अशी उधळपट्टी करणं आपल्याला मुळीच शोभत नाही. आताच्या आता जा, अन ही वही परत कर. अंग मी नाही का कॅलेंडरच्या जुन्या कागदांच्या पाठकोऱ्या बाजूवर लिहीत. मग तुला काय होते तसे करायला? यापुढे असे होता कामा नये. आले लक्षात?'

कथा उपदेश : काटकसर करण्याची सवय लहानपणापासून लावायला हवी.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:उत्तराषाढा |
| ४ जून २०२६ | २७:४१:२०+ |
| गुरुवार | योग:शुक्ल ०९:०२:१९ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव १०:२७:५८ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:बालव २३:३०:४२ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मकर०७:४१:१९ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – १८ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:चतुर्थी २३:३०:४२ | शुभ दिवस |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | 7 | | 1 | 9 | 5 | |
| | | | 6 | | 4 | 3 | | 2 |
| | | | | 2 | 9 | | 6 | |
| 6 | | 7 | | | | 1 | 3 | 9 |
| | 4 | | | | | | 7 | |
| 9 | 3 | 8 | | | | 2 | | 5 |
| | 9 | | 2 | 5 | | | | |
| 7 | | 1 | 4 | | 8 | | | |
| | 8 | 5 | 9 | | 7 | 6 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 7 | 9 | 8 | 4 | 6 | 2 | 5 |
| 5 | 9 | 6 | 2 | 1 | 7 | 3 | 8 | 4 |
| 4 | 2 | 8 | 6 | 5 | 3 | 7 | 9 | 1 |
| 2 | 7 | 5 | 1 | 6 | 9 | 8 | 4 | 3 |
| 3 | 6 | 4 | 7 | 2 | 8 | 5 | 1 | 9 |
| 9 | 8 | 1 | 3 | 4 | 5 | 2 | 6 | 7 |
| 7 | 1 | 3 | 8 | 9 | 6 | 4 | 5 | 2 |
| 8 | 4 | 2 | 5 | 3 | 1 | 9 | 7 | 6 |
| 6 | 5 | 9 | 4 | 7 | 2 | 1 | 3 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ००७० – रोमन सेनापती टायटसच्या सैन्याने जेरुसलेमची फळी फोडली व शहरात घुसले.
- १३०५ – क्लेमेंट पाचवा पोपपदी.
- १८३२ – पॅरिसमध्ये विद्यार्थ्यांचा उठाव.
- १८४९ – डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध–पीडमाँटची लढाई – दक्षिणेचा पराभव.
- १९०० – दुसरे बोअर युद्ध – ब्रिटीश सैन्याने प्रिटोरिया जिंकले.

### राष्ट्रीय

- २००६ – पेट्रोलचे दर प्रतिलिटर ४ तर डिझेलचे दर प्रतिलिटर २ रुपयांनी वाढविण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाने घेतला.
- २००७ – टाडा न्यायालयाने १९९३ मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील सलिम मिर्जासह दोघांना जन्मठेप तर तिघांना सक्तमजुरीची शिक्षा ठोठवली.

### जन्म

- १७७१ – अर्नेस्ट पहिला, हॅनोव्हरचा राजाचा जन्म.
- १८५० – पॅट गॅरेट, अमेरिकेच्या न्यू मेक्सिको राज्यातील पोलिस अधिकारीचा जन्म.
- १८७८ – पांचो व्हिया, मेक्सिकोचा क्रांतीकारीचा जन्म.

### निधन

- १०१७ – सांजो, जपानी सम्राटचे निधन.
- १३१६ – लुई दहावा, फ्रांसचा राजाचे निधन.
- १९१६ – लॉर्ड होरेशियो किचनर, ब्रिटीश फील्ड मार्शल, भारताचा व्हाईसरॉयचे निधन.
- १९७३ – मा. स. गोळवलकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दुसरे सरसंघचालकाचे निधन.

## : SMS :

Pehli baar Love kahan invent hua tha?
Socho..
MADE IN CHINA
Tabhi to Love ki koi Guaranty - Warranty nahi hoti.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.८ | २५.८ |
| अहमदनगर | ३६.९ | २५.५ |
| अकोला | ३९.९ | २६.६ |
| अमरावती | ४०.५ | २६.२ |
| बीड | ४३.५ | ३०.८ |
| भंडारा | ४१.९ | ३१.७ |
| बुलढाणा | ३७.४ | २४.६ |
| चंद्रपूर | ४३.१ | ३१.४ |
| चेन्नई | ४६.५ | ३५ |
| नवी दिल्ली | ३६.८ | २६.५ |
| धुळे | ४०.३ | २७ |
| गोंदिया | ४०.१ | ३०.६ |
| जळगाव | ४०.५ | २६.५ |
| कोल्हापूर | ३७.५ | २४.७ |
| लातूर | ३८.३ | २६.१ |
| मुंबई | ३९.४ | ३६.२ |
| नागपूर | ४०.९ | २९.६ |
| नांदेड | ४१ | २६.९ |
| नंदूरबार | ३८ | २५.८ |
| नाशिक | ३६.७ | २५.३ |
| पुणे | ३५.७ | २३.७ |
| पंढरपूर | ३९.२ | २६.१ |
| सातारा | ३७.७ | २२.५ |
| सांगली | ३९.१ | २५ |
| सोलापूर | ४०.३ | २६.५ |
| वर्धा | ४२.३ | २७.४ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. सकारात्मक विचारांमुळे अनपेक्षित चांगल्या गोष्टी घडतील.

**तूळ :** धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजकार्यासाठी तसेच धार्मिक कार्यासाठी निधी उभा करण्यात आपला पुढाकार राहील.

**वृषभ :** घरातील सुखसुविधा वाढविण्याकरीता महिला नवीन खरेदीचे मनसुबे आखतील. सतत पाहुण्यांची वर्दळ राहील.

**वृश्चिक :** राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांना समाजात नावलौकिक मिळेल. कामाच्या व्यापात आपल्या प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करु नका.

**मिथून :** संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल. हितशत्रूंच्या कारवायांवर मोठया युक्तीवादाने मात करता येईल. शेवटी विजय आपलाच होईल.

**धनू :** कोणत्याही मोहाला बळी पडू नका. अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. राजकीय कार्यकर्त्यांना काही अडचणींना सामोरे जावे लागेल.

**कर्क :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. जनसंपर्कातून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा स्वत:च्या काबूत ठेवाव्यात.

**मकर :** नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना चांगल्या संधी लाभतील. तरुणांच्या कौशल्याला चांगला वाव मिळेल.


**सिंह :** उधारी उसनवारी टाळावी. मोठे आर्थिक व्यवहार तूर्त टाळावेत. कामानिमित्त प्रवास घडतील. अपेक्षित पत्रव्यवहार होतील. भावंडांशी सुसंवाद साधाल.

**कुंभ :** राहत्या जागेचे किंवा व्यवसायाच्या जागेचे प्रश्न सुटतील. महिला स्वत:च्या पद्धतीने गृह सजावट करतील. महिलांना बदलाची नितांत गरज भासेल.

**कन्या :** जोडधंद्यातून चांगली आर्थिक प्राप्ती होईल. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल. कुटुंबियांचे सहकार्य लाभेल.

**मीन :** यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. स्वत:चे प्रयत्न स्वत:च करावेत. नवनवीन प्रकल्प हाती घेऊन यशस्वीपणे पूर्ण कराल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६८



**आडवे शब्द**

१. उघडपणे, बिनदिक्कत
४. देवाणघेवाण
८. नेहमीच्या सवयीतील
११. सततचा भडीमार
१२. दाजी भाटवडेकरांनी 'तुझं आहे तुजपाशी'मधील गाजवलेली भूमिका
१४. समस्येच्या निराकरणासाठी केलेले देवधर्म इ. उपाय
१५. ठिबकणारा, झिरपणारा
१६. हेलपाटा
१७. नवरदेव
१८. याच्याविण प्रीती देखील असत नाही, अशी कविची उक्ती आहे!
१९. धमनी
२१. पातळसर
२३. दुसऱ्याच्या मनांतील विचार ओळखणारा
२७. इंद्रिय
२९. जीभेचे चोचले
३१. पवित्र हज यात्रा करून आलेला
३२. आश्चर्य
३३अ. रणभूमी वा क्रीडांगणावर सम ोरासमोर पडलेली गाठ
३५. चिंतन
३६. आता ही जेवणात असणे पोळीपेक्षा महाग!
३७अ. झाल्यास तोटा, मनात असल्यास काळेबेरे
४०. 'शून्य' धावा दाखवणारे इंग्रजी बदक
४०अ. अंगरखा
४१. दुर्दशा
४२. मुस्कटदाबी
४३. झाड
४५. मज्जाव, बंदी
४६. पुणेरी आणि कोल्हापुरी चटकदार पदार्थ
४८. सासरी जाताना मागे वळून पाहणारी
४९. वाळलेली पाने इ.
५२. सर्व, सगळे
५३. दुमड घातलेली गूळखोबऱ्याच्या सारणाची करंजी
५५. शरीर
५६. हात
५७. धान्यसाठवणीची भिंतीतील जागा
५८. नन्नाच्या पाढ्याचा एकच एक अर्थ
६०. बागवान
६२. लोचट स्त्री
६५. मातीचा कण
६६. पवित्र
६७. समुद्रकिनारा
६८. अक्कलशून्य
६९. संघनायक
७०. जाणकार
७३. ख्रिश्चन धर्माचे प्रमुख धर्मगुरू
७४. ठेला, कच्चे दुकान
७६. डोंगराची सुरुवात
७७. समूह, घोळका
७९. मागावर कापड तयार करणारा
८०. काम टाळणारा
८१. दया, माफी

**उभे शब्द**

१. दोन संस्कृत महाग्रंथ
२. वृद्धत्व
३. सूर्योदयापासूनचा माध्यान्हीपर्यंतचा काळ
४. तहहयात
५. वर–वधू
६. असुर
७. नऊ भावनांचा समुच्चय
८. गोष्टीतील शर्यतीत पळणारे दोन प्राणी
९. लावणीतील प्रियकर
१०. विल्हेवाट
१३. चुलता
१५. मेख, मर्म
२०. आठवण
२२. मांडणी, सजावट
२४. जवळ, लगत
२५. अरण्य
२६. डावरा
२८. व्रत
३०. रमापत्नी
३३. केसांची बट
३४. मनाला आलेला थकवा
३५अ. गरज
३७. अस्वल
३८. अज्ञात, पडद्याआड राहिलेला
३९. निष्प्राण, निर्जीव
४४. याच्या घसरगुंडीने शेअरबाजारही घसरतो!
४५. फुलाफळांचे शेत
४७. झाडाच्या पानांचा आवाज
४८. कलावंत
५०. पुष्पदल
५१. याच्या मनात चांदण्याची भीती असते म्हणे!
५२. सूट
५३. रात्री चमकणारा किडा
५४. इंग्रजीतील जिंकलेला पहिला!
५५. पूर्ण बदल
५९. चित्रपट
६०. हक्कदार
६१. हंडा, कळशीची जोडीदार
६३. पठारी प्रदेश
६४. कैकयीचा मुलगा
६७. सामान्य प्रतीचे
७१. पारखी लोकांचे आवडते कंदमूळ?
७२. लक्ष्मी
७५. पान
७६. चबुतरा
७८. छाती, ऊर

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६७ चे उत्तर

**आडवे उत्तर** १.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

**उभे उत्तर :** १.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५ अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पुण्यात बेवारस वाहनांवर कारवाईचा वेग; 739 वाहनांचा लिलाव

पुणे (दैनिक संध्या) : रस्त्यावर बऱ्याच कालवधीपासून बेवारस स्थितीत उभ्या असलेल्या आणि वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वाहनांची माहिती पी.टी.पी. (पुणे सिटी ट्रॅफिक पोलिस) ॲपद्वारे वाहतूक विभागाला कळवावी, या वाहतूक पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून अशा वाहनांची छायाचित्रे प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. शहराच्या विविध भागांत धूळ खात पडून असलेल्या अशा वाहनांची छायाचित्रे, ते पडून असल्याचे ठिकाण याची देण्यात येत असून, या वाहनांची माहिती पोलिसांच्या पीटीपी ॲपवरही देण्यात येत आहे. आपल्यालाही आपल्या परिसरात पडून असलेल्या अशा वाहनांची माहिती आम्हाला मो. क्र. 8805027656 वर कळविता येईल. या माहितीसोबत वाहनाचा फोटो, ते पडून असलेल्या ठिकणचा संपूर्ण पत्ता, जवळची खूण इत्यादी माहिती कळविणे आवश्यक आहे. आपण आपल्या परिसरातील पोलिस ठाण्यातही अशा वाहनांची माहिती देऊ शकता, अशी माहिती मिळाल्यानंतर वाहतूक पोलिसांच्या वतीने वाहनांची पडताळणी करून त्यांच्या मालकांशी संपर्क साधण्यात येतो. त्याचा शोध न लागल्यास वाहतूक पोलिसांमार्फत ते वाहन तेथून हटविण्यात येते. वाहतुकीला अडथळा करीत रस्त्याकडेला धूळ खात पडून असलेल्या 739 बेवारस वाहनांचा लिलाव करून तब्बल पन्नास लाख दहा हजार रुपये पोलिसांनी शासनाच्या तिजोरीत जमा केली आहे. शहराच्या अकरा पोलिस ठाण्यांत आणि वाहतूक शाखेत ही वाहने गेल्या अनेक वर्षांपासून पडून होती.



### 'जे आहे ते खूप आहे' ही भावना जीवनातील उणिवा दूर करते : पंढरीनाथ महाराज

पुणे (दैनिक संध्या) : प्राप्त परिस्थितीला पर्याप्त मानावे. जे मला प्राप्त झाले आहे ते पुरेसे आहे, उचित आहे. जे आहे ते खूप आहे, अशी भावना जेव्हा आपल्या मनात निर्माण होते, तेव्हा जीवनातील उणिवा आपल्याला जाणवत नाहीत. त्यामुळे जीवन जगण्याचा एक वेगळाच आनंद प्राप्त होतो. हा आनंद शास्त्रांनी आपल्याला दिलेला अमूल्य वारसा आहे, असे प्रतिपादन वृंदावन धाम, संत शिवाई माता संस्थान श्री क्षेत्र शिऊर येथील भागवताचार्य श्रद्धेय स्वामी पंढरीनाथ महाराज शास्त्री यांनी केले. नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस् तर्फे शिक्षणमहर्षी प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त व अधिक मासाच्या निमित्ताने डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल १ च्या प्रांगणात आठव्या श्रीमद भागवत भक्ती कथा ज्ञानयज्ञ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्रा.डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी उपस्थित होते.

### परिवहन वाहनांसाठी सुरु होणाऱ्या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक

पुणे (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे मालवाहतूक, टुरिस्ट टॅक्सी, बस व ॲम्ब्युलन्स या परिवहन संवर्गातील वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना खाजगी वाहनांना आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक विहित शुल्क (तीनपट व नियमित शुल्क) भरून हवे असतील त्यांनी 4 जून रोजी सकाळी 11 ते दुपारी 2.30 या दरम्यान डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रती जोडून  जमा करावा. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी 5 जून रोजी सकाळी 10.30 वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल व त्याच दिवशी दुपारी 4.30 वाजता लिलाव प्रक्रिया करण्यात येईल. ज्या मालवाहू, टुरिस्ट टॅक्सी, बस व ॲम्ब्युलन्स संवगांतील वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक 5 जून रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी 11 ते दुपारी 2.30 या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या परिवहन विभागात जमा करावेत. यामध्ये एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक 8 जून रोजी सकाळी 10.30 वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. सदर अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी 4.30 वाजता परिवहन विभागात लिलाव करण्यात येईल. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. राखीव नोंदणी क्रमांक मिळाल्यानंतर 180 दिवसांच्या आत वाहन नोंदणीसाठी सादर न केल्यास संबंधित क्रमांक आपोआप रद्द होईल व भरलेली फी शासन खात्यात जमा होईल. कोणत्याही परिस्थितीत राखीव नोंदणी क्रमांकाकरिता भरलेली फी परत न करण्यात येणार नाही तसेच तिचे कोणतेही समायोजन करता येणार नाही. असे उप प्रादेशिक परिहवन अधिकारी पुणे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

### पीएलएस' व 'एएसयुएसई' बाबत तळेगाव येथे कार्यशाळेचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएस) व असंघटित क्षेत्रातील उद्यामांचे वार्षिक सर्वेक्षणाच्या  (एएसयुएसई) अनुषंगाने 5 ते 10 जून या कालावधीत राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विभागीय आयुक्त पुणे विभाग,  पुणे महानगरपालिकेचे आयुक्त तसेच जिल्हाधिकारी हे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाचे सह आयुक्त सुनील जाधव यांनी दिली आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, कोलकाता यांच्यामार्फत 'पीएलएस' व 'एएसयुएसई'बाबत सर्वेक्षण माहे जानेवारी 2026 पासून सुरु असून डिसेंबरपर्यंत करण्यात येणार आहे.  या  सर्वेक्षणांचे क्षेत्रीय कामकाज अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या इप्सॉस रिसर्च प्रायव्हेट लि. मुंबई या संस्थेमार्फत करण्यात येणार आहे, असेही श्री. जाधव यांनी कळविले आहे.

## पुण्यात फीडर पिलर हटवण्यावरून
# महापालिका-महावितरण आमनेसामने

पुणे (दै. संध्या)



शहरातील प्रमुख रस्ते आणि पदपथांवर पादचाऱ्यांसाठी जीवघेणे आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे महावितरणचे 'फीडर पिलर' स्थलांतरित करण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. हे अडथळे दूर करण्यासाठी महापालिकेने महावितरणकडे वारंवार तगादा लावला असला, तरी महावितरणने मात्र हात झटकले आहेत. 'फीडर पिलर' स्थलांतरित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याचे सांगत महावितरणने या कामाचा संपूर्ण आर्थिक भार थेट महापालिकेच्या माथी मारला आहे. विशेष म्हणजे, या कामासाठी लागणारे 1.3 टक्के पर्यवेक्षण शुल्कही (सुपरव्हिजन चार्जेस) महापालिकेनेच भरावे, असे पत्र पाठवून महावितरणने महापालिकेलाच कोंडीत पकडले आहे.

शहरात आजघडीला सुमारे एक लाखाच्या आसपास फीडर पिलर आहेत. शहरातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर किंवा पदपथांच्या मध्यभागी हे पिलर उभारण्यात आले आहेत. गर्दीच्या बाजारपेठा, शाळा-महाविद्यालयांचे परिसर आणि निवासी भागांतील पदपथांवर हे पिलर पादचाऱ्यांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहेत. यामुळे पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, रस्तारुंदीकरणात आणि स्मार्ट रस्ते प्रकल्पांच्या कामातही मोठे अडथळे येत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पथ विभागाने हे पिलर त्वरित स्थलांतरित करावेत, अशी मागणी पत्राद्वारे केली होती. तसेच 'पुणे शहर परिवर्तन समिती'च्या बैठकीतही यावर सविस्तर चर्चा झाली होती.

महावितरणच्या रास्ता पेठ शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांनी महापालिकेला एक पत्र पाठविले आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, निधीअभावी महावितरण स्वतःच्या खर्चाने हे पिलर स्थलांतरित करू शकत नाही. 'पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धा' आयोजनाच्या निमित्ताने शहरातील 32 रस्त्यांवरील सुमारे 1322 फिडर पिलर व इतर विद्युत यंत्रणा स्थलांतरित करण्यासाठी अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता महापालिकेने स्वतःच्या पथ आणि विद्युत विभागामार्फत हा खर्च करून हे काम करून घ्यावे. तसेच महावितरणला नियमानुसार 1.3 टक्के पर्यवेक्षण शुल्क अदा करावे, असे महावितरणने पत्रात नमूद केले आहे. वाहतुकीला अडथळा ठरणारी फीडर पिलर हटवण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार महावितरणने स्वतःच्या खर्चाने 'फीडर पिलर' स्थलांतरित करणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे. मात्र, निधी नसल्याचे कारण देत 'महावितरण'ने हात वर केले आहेत.

### फीडर पिलर स्थलांतरित करण्यास मिळेना जागा

शहरात जवळपास लाखभराच्या आसपास महावितरणचे फीडर पिलर आहेत. हे फीडर पिलर पदपथांवर तर काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला आहेत. वाहतुकीला याचा अडथळा ठरत आहे. पावसाळ्यात तर यातील करंट रस्त्यावरील पाण्यात उतरून मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे फीडर पिलर स्थलांतरित करणे गरजेचे आहे. मात्र, जागाच नसल्याने ते स्थलांतरित कोठे करायचे हा प्रश्न आहे. सध्या महापालिकेचा रस्ते विभाग, विद्युत विभाग व महावितरणमार्फत सर्वेक्षण सुरू असून, यानंतर याबाबतचा निर्णय होणार आहे.

## व्यापार करताना सेवाभाव जपणे गरजेचे
### पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

पुणे (दै. संध्या)




व्यापार करताना केवळ आर्थिक नफ्यावर लक्ष केंद्रित न करता समाजाप्रती सेवाभाव जपणे आवश्यक आहे. प्रत्येकाने भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगणे आवश्यक असून गुणवत्ता, सचोटी व प्रामाणिकपणाच्या बळावर व्यापारात यश मिळते, असे सांगत समाजासाठी योगदान देण्याची भावना व्यापाऱ्यांनी जपावी, असे प्रतिपादन पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केले.

स्टेशनरी, कटलरी अँड जनरल मर्चंट असोसिएशनच्या वतीने व्यापारी एकता दिनानिमित्त एस. एम. जोशी सभागृहात वार्षिक पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, अध्यक्ष संजय राठी, उपाध्यक्ष नितीन पंडित, सचिव किशोर चांडक, खजिनदार सुनील शिंगवी तसेच सूर्यकांत पाठक, अरविंद पटवर्धन, मदनसिंह राजपूत, राजेश गांधी, सुरेश नेरगावकर, सचिन जोशी, मोहन साखरिया, किशोर पिरगल, अनिल प्रभुने, मनीष परदेशी, किरण चौहान, अविनाश मुजुमदार, धनंजय रामलिंगे, सागर काकडे, सुमित कुडचे आदी मान्यवर उपस्थित होते.

यंदाचा 'व्यापारी भूषण' पुरस्कार विकी पॉलिमर्स प्रा. लि. चे दिलीप कुंभोजकर यांना प्रदान करण्यात आला. या तसेच सर्वोत्तम दुकान पुरस्कार जयश्री ग्रोसरी अँड ड्रायफ्रूट्सचे श्याम अग्रवाल, उत्कृष्ट विक्रेता कामगिरी पुरस्कार अरुणकुमार अँड कंपनीचे सचिन चांडक, कै. डॉ. धनंजय व साधनाताई गोरे स्मृती पुरस्कार आशा मेहता, उत्कृष्ट महिला व्यापारी पुरस्कार तुळशीबागेतील सुवर्ण कलाकार स्वाती आंबासनकर आणि 'फिनिक्स पुण्याचा अभिमान' पुरस्कार दीपक केटरर्सचे दीपक व निखिल मालानी यांना प्रदान करण्यात आले. या सर्व पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व श्रीफळ असे होते.

## शहरात नालेसफाईची मुदत १५ जूनपर्यंत वाढली; पावसाळी तयारी रखडली

पुणे (दै. संध्या)



पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले, पावसाळी गटारे, स्टॉर्म वॉटरलाइन्स आणि कल्व्हर्ट्सची सफाई 31 मेपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवलेल्या महापालिकेला ही मुदत पाळण्यात अपयश आले. त्यामुळे ही डेडलाइन आता 15 जूनपर्यंत वाढवली आहे. उर्वरित सर्व कामे त्या कालावधीत पूर्ण केली जातील, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिली आहे.

पालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरातील नालेसफाईचे 85 टक्के, पावसाळी गटारसफाईचे 59 टक्के आणि चेंबर्ससफाईचे 63 टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कामे अद्याप अपूर्ण आहेत. पावसाळा तोंडावर आल्याने उर्वरित कामांचा वेग वाढविण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.

महापालिकेच्या 15 क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत 129 नाले असून, त्यांची एकूण लांबी 2 लाख 34 हजार 512 मीटर आहे. यापैकी 2 लाख 21 हजार 500 मीटर नाल्यांची सफाई करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी आत्तापर्यंत 55 हजार 391 मीटर नाल्यांची स्वच्छता केली असून, 1 लाख 67 हजार 59 मीटर नाल्यांची सफाई अद्याप बाकी असल्याची माहिती समोर आली आहे.

सध्या दररोज सरासरी 3,512 मीटर नाले साफ केले जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.


शहरातील 457 कल्व्हर्ट्सपैकी 158 ठिकाणे पूर आणि पाणी साचण्याच्या दृष्टीने संवेदनशील मानली जातात. या ठिकाणी दरवर्षी पावसाळ्यात गंभीर समस्या निर्माण होतात. मात्र, अशा 21 ठिकाणी अद्याप आवश्यक कामे पूर्ण झालेली नाहीत. प्रशासन दररोज 24 कल्व्हर्ट्सची सफाई करीत असल्याचा दावा करीत असले तरी कामांचा वेग अपेक्षेप्रमाणे नसल्याची चर्चा आहे.

## 'वीरांचे वीर धर्मवीर' मधून उलगडला शंभूराजांच्या शौर्यगाथेचा थरारक आविष्कार

पुणे (दै. संध्या)

पुरंदरच्या तहानंतरचा संघर्ष, स्वराज्यरक्षणासाठीच्या अखंड मोहिमा, औरंगजेबासमोर न झुकलेली जाज्वल्य भूमिका आणि धर्मासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान... असा छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील तेजस्वी क्षणांचा प्रवास 'वीरांचे वीर धर्मवीर' या दृकश्राव्य प्रयोगातून जिवंत झाला. शंभूराजांच्या जन्मापासून अमरत्वापर्यंतचा शंभूचरित्राचा हा प्रवास पडद्यासह अमोघ वाणीतून अनुभवताना उपस्थित पुणेकर इतिहासाच्या त्या सुवर्ण पण वेदनादायी पर्वाशी एकरूप झाले.

विवेक व्यासपीठ आयोजित 'वीरांचे वीर धर्मवीर' या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन एस. पी. कॉलेजमधील लेडी रमाबाई हॉल येथे करण्यात आले. या कार्यक्रमास महापौर मंजुषा दीपक नागपुरे, ह.भ.प. संग्राम भंडारे, दिपक नागपुरे, शि.प्र.मंडळी नियामक मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, तुषार कुलकर्णी, महेश पवळे,  यशोधन भिडे, वर्षा भोळे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि सादरीकरण नीलेश रमेश भिसे यांचे असून, त्यांनी संभाजी महाराजांचे जीवन, त्यांचे कार्य, लेखन, विविध मोहिमा आणि युद्धनीती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात केले. यावेळी अभिवाचन, चलचित्र, ॲनिमेशन, संगीत आणि प्रकाशयोजनेच्या माध्यमातून इतिहासातील विविध प्रसंग जिवंत केले.



मंजुषा नागपूरे म्हणाल्या, आजची तरुणपिढी ही आभासी माध्यमांच्या विळख्यात अडकत आहे. अशा वेळी या आभासी माध्यमाचाच वापर करून तरुणांसमोर आपला जाज्वल्य इतिहास मांडला जात आहे, हे कौतुकास्पद आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास केवळ युद्धातील पराक्रमांपरुता मर्यादीत नव्हता तर त्यांच्या अनेक पैलू होते. ते या कार्यक्रमात मांडले आहेत. इतिहास केवळ वाचून नाही, तर तो अनुभवातून जगला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

नीलेश भिसे म्हणाले, पराक्रमाची तलवार, विद्वत्तेचे तेज आणि धर्मरक्षणासाठीचे सर्वोच्च बलिदान यांचा संगम असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनप्रवास 'वीरांचे वीर धर्मवीर' या दृकश्राव्य प्रयोगातून साकारला. या चित्तथरारक दृकश्राव्य प्रयोगाने उपस्थितांना केवळ इतिहास दाखवला नाही, तर शंभूराजांच्या त्यागाची अनुभूतीही दिली, असेही त्यांनी सांगितले. ज्ञानदा भिसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

## सोनालिका : मे महिन्यातील आजपर्यंतची सर्वाधिक एकंदर १७,२०४ ट्रॅक्टरची केली विक्री

पुणे (दै. संध्या)




भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने मे महिन्यातील आतापर्यंतची सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टरची विक्री नोंदवत आर्थिक वर्ष २०२७ मध्ये आपल्या गतीला वेग दिला आहे. तसेच एकूण २१ टक्के वाढ नोंदवून उद्योगाच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. सोनालिकाचा हा नवा मैलाचा दगड शेतकऱ्यांपर्यंत 'जीतने का दम' पोहोचवण्यावर ब्रँडने सातत्याने दिलेला भर आणि भारताला कृषी महासत्ता बनवण्याच्या उद्देशाने शेतीच्या दृष्टीने कार्यक्षम आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यात त्याची भूमिका अधोरेखित करणारा आहे. याशिवाय कंपनीने भारतातील आगामी खरीप हंगामाच्या तयारीचा एक भाग म्हणून आजपर्यंतच्या सर्वाधिक मासिक १७,०२९ ट्रॅक्टर उत्पादनाची नोंद केली आहे.

मान्सून हा अनेक दशकांपासून भारतीय शेतीमध्ये आशावादाला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, शेतकरी आता सुधारित पीक व्यवस्थापन आणि चांगल्या उत्पादनासाठी सिंचनाच्या वाढत्या तीव्रतेवर अवलंबून राहत असून तांत्रिकदृष्ट्या प्रगत ट्रॅक्टर शोधत आहेत. भविष्यासाठी सज्ज असलेल्या उत्पादनांच्या माध्यमातून 'जीतने का दम'वर असलेल्या बळकट विश्वासाच्या आधारे सोनालिका ट्रॅक्टर्स तज्ज्ञ अभियांत्रिकीसह डिझाइन केलेले शक्तिशाली ट्रॅक्टर आणि जगातील नंबर १ ट्रॅक्टर प्लांटमध्ये विकसित करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या इंजिनांसह शेतकऱ्यांना सेवा देण्यासाठी सज्ज आहे. ग्रामीण बाजारपेठांमध्ये कंपनीची वाढणारी उपस्थिती आणि अविरतपणे ग्राहकांच्या समाधानावर लक्ष केंद्रित केल्याने देशाच्या कृषी वाढीच्या प्रवासात विश्वासू भागीदार म्हणून तिचे स्थान आणखी मजबूत झाले आहे.

इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "उद्योगाच्या कामगिरीला मागे टाकत एकूण २१ टक्के वाढीच्या आधारे मे महिन्यातील आतापर्यंतच्या सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टर विक्रीची नोंद करण्याचा आम्हाला आनंद होत आहे.  भारतीय शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी उमेदीने तयारी आधीच सुरू केली असून अधिक आत्मविश्वासाने यांत्रिकीकरणाची निवड करीत आहेत, याचा हा एक धाडसी संकेत आहे. यासोबतच शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही आजपर्यंतच्या सर्वाधिक १७,०२९ ट्रॅक्टरच्या मासिक उत्पादनाची नोंद केली आहे.

केवळ संख्येपेक्षाही भारतीय शेतीतील चिरस्थायी चैतन्य ही आम्हाला सर्वाधिक प्रेरणा देणारी गोष्ट आहे. इथे प्रत्येक हंगामाची सुरुवात या विश्वासाने होते, की उद्याचे पीक आजच्यापेक्षा चांगले असेल आणि विकास नेहमीच शक्य आहे. शाश्वत प्रगती ही सातत्य व लवचिकतेवर आधारित असते आणि शेतकऱ्यांच्या हाती अधिक अधिकार देण्यासाठी ती कटिबद्ध असते, यावर आमचा नेहमीच विश्वास राहिला आहे. आयटीएलमध्ये ही आमची सर्वात मोठी ताकद आहे. तिच्यामुळेच पारंपरिक समजुतींना आव्हान देणे आणि 'जीतने का दम' या भावनेने नवीन मापदंड स्थापित करणे आम्हाला शक्य होते.

## हेल्पलाइन व व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण

पुणे (दै. संध्या)

भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड, इंडसइंड बँक व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 1962 या टोल-फ्री हेल्पलाइनने राज्यातील पशुवैद्यकीय सेवांचे जाळे बळकट केले आहे.

'मोबाईल व्हेटर्नरी युनिट्स' म्हणजेच फिरत्या पशुवैद्यकीय वाहनांच्या माध्यमातून या उपक्रमाने विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या दारात पशुवैद्यकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत 8 लाखांहून अधिक जनावरांवर उपचार करण्यात आले असून, यामुळे पशुधनाची वेळेवर, सुलभ व विश्वासार्ह काळजी घेणे शक्य झाले आहे.

या उपक्रमाच्या यशानंतर, भारत फायनान्शियल इंक्लुजन लिमिटेड (इंडसइंड बँक) व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सेवा अधिक गतिमान करण्यासाठी 'व्हॉट्सॲप-आधारित चॅटबॉट सेवा' सुरू केली आहे. या डिजिटल उपक्रमाचा उद्देश संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळवणे सोपे करणे, संवाद सुलभ करणे व रिअल-टाइम (तात्काळ) पशुवैद्यकीय साहाय्य प्रदान करणे हा आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या घरातूनच, व्हॉट्सॲपच्या अत्यंत सोप्या व वापरण्यास सुलभ इंटरफेसचा वापर करून जलद व सोयीस्कर पशुवैद्यकीय सल्ला आणि सेवा मिळाव्यात, अशा पद्धतीने हा चॅटबॉट डिझाइन करण्यात आला आहे.

शेतकरी +919063142299 या क्रमांकावर व्हॉट्सॲपवर "Hi" पाठवून खालील सेवा मिळवू शकतात: पशुधनाचे आजार, उपचार आणि लसीकरणाबाबत माहिती मिळवणे. पशुसंवर्धन आणि सरकारी योजनांची सविस्तर माहिती मिळवणे. चॅट (Chat), ऑडिओ कन्सल्टेशन (व्हॉईस कॉल सल्ला) आणि व्हिडिओ कन्सल्टेशन, टेलिकन्सल्टेशन (व्हिडिओ कॉल सल्ला) या माध्यमांद्वारे पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधता येणार आहे.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण प्रक्रियेला स्थगिती द्या

**मुंबई (दै. संध्या) :**

- 'पुनर्विलोकन समिती'ची सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी
- मागण्या मान्य न झाल्यास ३० जून रोजी मुंबईत 'विधानभवन घेराव आंदोलन'!



अनुसूचित जातींच्या (SC) आरक्षणात प्रस्तावित असलेल्या उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेला राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण होईपर्यंत तातडीने स्थगिती देण्यात यावी, या मागणीसाठी 'महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती'तर्फे राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्री संजय शिरसाट यांना निवेदन सादर करण्यात आले. या मागण्या मान्य न झाल्यास समितीच्या वतीने येत्या ३० जून रोजी मुंबईत 'विधानभवन घेराव आंदोलन' करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्री शिरसाट यांची भेट घेऊन या विषयातील कायदेशीर व तांत्रिक त्रुटींवर सविस्तर चर्चा केली. या प्रसंगी प्रवीण सरोदे, सुधाकर अभंग, सुरेश शिंदे, भाऊसाहेब साबळे आणि रुपेश वाघचौरे प्रामुख्याने उपस्थित होते. या विषयावर आलेल्या ७५ हजारांपेक्षा अधिक हरकती पुढील कारवाईसाठी 'बार्टी'कडून (BARTI) राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्या असून, राज्याचे मुख्य सचिव त्यावर पुढील कायदेशीर कारवाई करतील, अशी माहिती सामाजिक न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उपवर्गीकरणासाठी 'मोजता येण्याजोग्या सांख्यिकी माहितीची' (Quantifiable Data) कायदेशीर अट आहे. केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी समोर येत नाही, तोपर्यंत केवळ अनुमानाच्या आधारे उपवर्गीकरण करणे असंवैधानिक ठरेल. त्यामुळे ही प्रक्रिया तातडीने स्थगित करावी. न्यायमूर्ती अनंत बदर समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला असला, तरी तो अजूनही गोपनीय ठेवण्यात आला आहे. हा अहवाल आधी जनतेसाठी खुला करावा आणि त्यानंतरच त्यावर पुढील प्रक्रिया केली जावी, अशी आग्रही मागणी शिष्टमंडळाने केली. आरक्षण उपवर्गीकरण प्रक्रिया रद्द करावी आणि खाजगी क्षेत्रात आरक्षण द्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी ३० जून रोजी आझाद मैदान, मुंबई येथून विधानभवनावर भव्य 'घेराव आंदोलन' छेडण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. "खूप लढलो बेकीने, लढू आता एकीने" असा निर्धार करत या मोर्चात राज्यभरातून समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. कोट्यवधी जनतेच्या भविष्याशी निगडित असलेल्या या संवेदनशील विषयावर केवळ प्रशासकीय स्तरावर निर्णय घेणे अयोग्य आहे. बदर समितीचा अहवाल विधिमंडळाच्या पटलावर ठेवून त्यावर विशेष अधिवेशन किंवा सविस्तर चर्चा घडवून आणली जावी. तसेच, केंद्र सरकारच्या धोरणानुसार अनुसूचित जाती आरक्षणात 'क्रीमी लेयर' लागू होणार नाही, याची लेखी कायदेशीर तरतूद झाल्याशिवाय राज्य सरकारने कोणतीही घाई करू नये, असे अध्यक्ष राहुल डंबाळे यांनी स्पष्ट केले. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले असून, या तांत्रिक आणि संवेदनशील विषयावर सर्व कायदेशीर बाजू तपासून सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे.

# अक्षय ऊर्जा स्वीकाराबाबत अवादा ग्रुपची जनजागृती

**पुणे (दै. संध्या) :**




अक्षय ऊर्जेबाबत देशभरात जनजागृती वाढवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांतर्गत, भारतातील अग्रगण्य एकात्मिक ऊर्जा संक्रमण समूहांपैकी एक असलेल्या अवादा ग्रुपने 'अवादा भारत उदय यात्रा' हा आपला प्रमुख उपक्रम पुण्यात राबविला. अवादा ग्रुपने या माध्यमातून नागरिक, स्थानिक समुदाय आणि विविध घटकांशी शाश्वत ऊर्जा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत संवाद साधला.

८ मे २०२६ रोजी नोएडामधून या यात्रेला सुरुवात करण्यात आली. अक्षय ऊर्जा स्वीकार आणि शाश्वत जीवनशैली याबाबत तळागाळात जागरूकता निर्माण करणे, तसेच भारताच्या स्वच्छ आणि अधिक आत्मनिर्भर ऊर्जा भविष्याच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणाला बळ देणे, हा या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा उद्देश आहे.

विशेष डिझाइन केलेल्या या व्हॅनने आतापर्यंत उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या चार राज्यांसह नऊ शहरांमधून सुमारे १७१४ किमीचा प्रवास पूर्ण केला आहे. प्रत्यक्ष उपक्रम आणि जनसहभाग मोहिमांच्या माध्यमातून ही यात्रा थेट स्थानिक समुदायांशी संवाद साधत आहे.

पुण्यातील मुक्कामादरम्यान या यात्रेमध्ये विविध आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. अक्षय ऊर्जेच्या संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यासाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले. तसेच, अक्षय ऊर्जेबाबत असलेल्या सर्वसामान्य गैरसमजांवर आधारित संवादात्मक सत्रांचे आयोजन करण्यात आले. नागरिकांना शाश्वत जीवनशैलीसाठी वैयक्तिक बांधिलकी व्यक्त करता यावी, यासाठी 'डिजिटल ग्रीन प्लेज' (डिजिटल हरित प्रतिज्ञा) घेण्याची संधीही उपलब्ध करून देण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### हिंदू संस्कृतीचा प्रचार करणे हे सर्वांचेच कर्तव्य - चारुदत्त आफळे




पुणे (दैनिक संध्या) : गजवा ए हिंद करण्यासाठी अनेक लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे काम करत आहेत. या देशात हिंदू जिवंतच राहू नयेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ही मानसिकता हाणून पाडण्यासाठी प्रत्येकाने हिंदू संस्कृतीचा आपापल्या परीने प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे नव्हे तर ती काळाची गरज बनली आहे. हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आपले कर्तव्यच आहे असे मत जेष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे प्रियकर हिंदुस्थान या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमाला मध्ये चारुदत्त आफळे बोलत होते. यावेळी वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहंदळे, संचालक अमेय सप्रे ,प्रीतम थोरवे, शेखर यादव आदी यावेळी उपस्थित होते. चारुदत्त आफळे म्हणाले, हिंदू किंवा हिंदुस्थान हे शब्द उच्चारताना आपल्याला संकोचल्यासारखे वाटावे अशी आज परिस्थिती निर्माण झाली आहे. इतर संस्कृती किंवा देश आपले नाव उच्चारताना अभिमानाची भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होते परंतु आपल्याला मात्र संकोचल्यासारखे होते ही केवळ आपल्यासाठीच नव्हे तर हिंदू संस्कृतीसाठी धोकादायक बाब आहे. त्यामुळे हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ही भावना आपण मनामनामध्ये रुजवली पाहिजे असे आवाहन चारुदत्त आफळे यांनी यावेळी केले. स्वातंत्र्यानंतर शिक्षण व्यवस्थेवर चुकीच्या शक्तींचा पगडा असल्यामुळे केवळ इंग्रजीचे लांगुलचालन आणि पाश्चात्य संस्कृतीचे उदात्तीकरण अशा प्रकारे हिंदू संस्कृतीला कमी लेखण्याचा प्रकार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होत आला आहे. परंतु आता जेव्हा गजवा ए हिंद करण्यासाठी शक्ती एकवटल्या असताना हिंदूंनीही आपली वज्रमूठ बळकट करणे गरजेचे आहे तरच खऱ्या अर्थाने आपण स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वप्नातील अखंड भारत निर्माण करू शकू असा विश्वास चारुदत्त आफळे यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमेय सप्रे यांनी केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रीतम थोरवे यांनी आभार मानले.

### नागपूर-मुंबई विमानसेवा कपातीवर गडकरी आक्रमक; टाटा समूहाला पत्र

नागपूर (दैनिक संध्या) : नागपूर-मुंबई या महत्त्वाच्या हवाई मार्गावरील एअर इंडियाच्या विमानफेऱ्या कमी करण्याच्या निर्णयाविरोधात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी थेट हस्तक्षेप करत टाटा समूहाचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांना पत्र लिहिले आहे. नागपूरच्या वाढत्या औद्योगिक, व्यावसायिक आणि लॉजिस्टिक महत्त्वाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय शहराच्या विकासाला बाधा आणणारा ठरू शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. एअर इंडियाने नागपूर-मुंबई मार्गावरील सकाळ आणि सायंकाळच्या नियमित विमानफेऱ्या १ जून ते ३१ जुलै या कालावधीत तात्पुरत्या स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे तातडीने भरा

**कोरेगावमुळ (दै. संध्या) :**

शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे कालमर्यादेत तातडीने भरण्याची प्रक्रिया गतीमान करावी. तसेच विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अबू आझमी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले, तर आमदार सना मलिक-शेख, आमदार रईस शेख उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख उपस्थित यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य शासन विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय आणि परिणामकारक पद्धतीने कार्य करणे आवश्यक आहे असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या.

# Ai+ Smartphone ने ₹३५० कोटींहून अधिक महसूल मिळवला

**पुणे (दै. संध्या) :**




Ai+ Smartphone ने आज एक महत्त्वपूर्ण विकासाचा टप्पा जाहीर केला, ज्यामध्ये केवळ मे २०२६ या महिन्यात ३ लाखांहून अधिक युनिट्स स्मार्टफोन विक्री आणि ₹३५० कोटींहून अधिक महसूल प्राप्त झाला. ही कामगिरी भारतातून एक नव्या पिढीचा तंत्रज्ञान ब्रँड उभारण्याच्या Ai+-च्या दृष्टिकोनाला मिळत असलेल्या वाढत्या गतीचे प्रतिबिंब आहे. नवोन्मेष, सुलभता आणि ग्राहक-प्रथम विचारसरणी एकत्र करून नव्या पिढीच्या वापरकर्त्यांसाठी स्मार्टफोन अनुभवाची पुनर्कल्पना केली जात आहे.

भारतीय स्मार्टफोन बाजारात प्रवेश केल्यापासून एक वर्षपेक्षा कमी काळात, Ai+ Smartphone देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्मार्टफोन ब्रँड्सपैकी एक म्हणून उदयास आले आहे, जे एका साध्या परंतु शक्तिशाली विश्वासाने प्रेरित आहे: तंत्रज्ञान केवळ काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार असू नये, ते सर्वांसाठी सुलभ असले पाहिजे. हा टप्पा Ai+ Smartphone Nova2, Nova2 Ultra & NovaFlip-च्या एप्रिल २०२६ मधील यशस्वी प्रक्षेपणानंतर आला आहे, जे झपाट्याने ब्रँडच्या वाढीचे मुख्य चालकबल बनले आहे आणि नवोन्मेष, डिझाइन व मूल्य एकत्र करणाऱ्या तंत्रज्ञान अनुभवांसाठी भारतीय ग्राहकांची वाढती भूक अधोरेखित करते.

या टप्प्याबद्दल भाष्य करताना, Madhav Sheth, CEO, Ai+ Smartphone आणि संस्थापक, NxtQuantum Shift Technologies, म्हणाले, "एकाच महिन्यात ३ लाख युनिट्स आणि INR ३५० कोटींहून अधिक महसूल ओलांडणे हे आमच्यासाठी केवळ एक महत्त्वाचा व्यावसायिक टप्पा नाही, तर ते एका व्यापक चळवळीचे प्रमाणीकरण आहे. आमची महत्त्वाकांक्षा कधीच केवळ स्मार्टफोन विकण्याची नव्हती," असे Sheth यांनी पुढे सांगितले. "तंत्रज्ञान अधिक सुलभ, अधिक पारदर्शक आणि कोट्यवधी लोकांसाठी अधिक विश्वासार्ह बनवून डिजिटल विभाजनाची दरी कमी करण्यात मदत करणे ही आमची महत्त्वाकांक्षा आहे. आणि आम्ही अजूनही त्या प्रवासाच्या सुरुवातीला आहोत."

प्रक्षेपणापासून एक वर्षपेक्षा कमी काळात, Ai+ Smartphone भारतातील सर्वाधिक लक्षपूर्वक पाहिल्या जाणाऱ्या तंत्रज्ञान ब्रँड्सपैकी एक म्हणून उदयास आले आहे. उपकरणांचा वाढता पोर्टफोलिओ आणि उच्च-प्रभावी ग्राहक उपक्रम व भागीदारींद्वारे, ब्रँडने भारतातून एक तंत्रज्ञान परिसंस्था निर्माण करण्याच्या दृष्टिकोनाभोवती सातत्याने गती निर्माण केली आहे.

Ai+ Smartphone Nova2 Series Flipkart आणि संपूर्ण भारतातील निवडक किरकोळ विक्री केंद्रांवर विशेषरित्या उपलब्ध आहे.

# अली दारूवाला यांची प्रवक्ते आणि अधिकृत टीव्ही पॅनेलिस्ट म्हणून नियुक्ती

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



सामाजिक कार्यकर्ता अली दारूवाला, पतित पवन संघटना, महाराष्ट्राचे मुख्य प्रवक्ते आणि अधिकृत टीव्ही पॅनेलिस्ट म्हणून नियुक्ती झाली आहे. हे नियुक्तीपत्र महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सोपानराव देशमुख व महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस नितीन सोनटक्के यांच्या हस्ते देण्यात आले. पतित पवन संघटना ही एक हिंदुत्ववादी संघटना असून, ती हिंदू समाजाचे हक्क, प्रतिष्ठा आणि अस्मिता (आत्मसन्मान) यांचे रक्षण करण्यासाठी समर्पित आहे. ही संघटना महाराष्ट्रातील हिंदूंच्या उन्नतीसाठी कार्य करते आणि त्यांचा सांस्कृतिक वारसा, अभिमान व हितसंबंध जतन आणि संवर्धित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. मुख्य प्रवक्ते म्हणून, मी मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि दूरदर्शन माध्यमांसमोर संघटनेचे प्रतिनिधित्व करीन आणि हिंदू समाज व व्यापक समाजाशी संबंधित विषयांवर सार्वजनिक चर्चांमध्ये सहभागी होईन. ही नियुक्ती उल्लेखनीय आहे, कारण मी एक सुन्नी मुस्लिम आहे आणि माझ्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील या संघटनेत ही जबाबदारी सोपवण्यात आलेल्या मुस्लिम समाजातील पहिल्या सदस्यांपैकी मी एक आहे. हे सर्व समाजांमध्ये विधायक संवाद आणि सार्वजनिक सहभागाप्रती असलेली वचनबद्धता दर्शवते. माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल मी पतित पवन संघटनेच्या नेतृत्वाचे आभार मानतो आणि समर्पण व वचनबद्धतेने सेवा करण्यास उत्सुक आहे.

**अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

सी. विंग, पाचवा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे स्टेशन, पुणे-४११००१,
दुरध्वनी क्र.-०२०२६१२४१३७ Email - id addcoilpune@gmail.com

आरटीएस.२/अ/९७३/२०२४. दिनांक २५/०५/२०२६

नोटीस

१. श्री काशिनाथ गोविंद भोर
२. श्री भिमाजी दादाभाऊ भोर दोघेही रा. हिवरे बु.ता.जुन्नर जि.पुणे. -- वादी

विरुद्ध

३. देवराम गोविंद भोर ( मयत ) तर्फे वारस-
३ अ. कमल देवराम भोर
३ ब. श्री सुरेश देवराम भोर
३ क. श्री रमेश देवराम भोर
३ ड. श्री गणेश देवराम भोर
नं.३अ ते३ड रा. हिवरे बु. ता. जुन्नर जि. पुणे
४. किसन गोविंद भोर ( मयत ) तर्फे वारस-
४ अ. श्री अशोक किसन भोर
रा. भोर निवास, रुम नं.१. जव्हार भाई फ्लॅट परब चाळीपुढे, घाटकोपर पश्चिम मुंबई -८४
४ ब. श्री प्रदीप किसन भोर
रा. रूम नं. एन. आय. जी.४/२, आर. बी. कदम मार्ग, जवाहरलाल प्लॉट, बार्वेनगर, मुंबई - ८४
४ क. श्री धनंजय किसन भोर
४ ड. अंजनाबाई किसन भोर
नं.४क,४ड रा.भोर निवास, रुम नं.१. जव्हार भाई फ्लॅट परब चाळीपुढे, घाटकोपर पश्चिम मुंबई -८४
५. श्री शशांक शंकर भाऊ
६. श्री शांताराम दादाभाऊ भोर
७. श्री विष्णू दादाभाऊ भोर
८. श्री महादेव दादाभाऊ भोर
नं.६ ते ८ रा. हिवरे बु. ता. जुन्नर जि. पुणे
९. अंजना रामदास कुऱ्हाडे रा.आळे ता.जुन्नर जि.पुणे
१०. शारदा विष्णू तांबे रा.ओतुर ता.जुन्नर जि.पुणे
११. उषा सिताराम दुरगुडे रा. दुरगुडेपट, पिंपरी पेंढार, ता.जुन्नर जि.पुणे
१२. सुमन गुलाब सोमवंशी
रा.भोर निवास, रुम नं.१. जव्हार भाई फ्लॅट परब चाळीपुढे, घाटकोपर पश्चिम मुंबई -८४
१३. अंबादास गोविंद भोर ( मयत ) तर्फे वारस -
नर्मदाबाई अंबादास भोर ( मयत ) तर्फे वारस -
१३ अ. श्री गजानन अंबादास भोर
१३ ब.राजाराम अंबादास भोर
१३ अ व १३ बी रा. कैलासनगर, पो.येडगांव ,ता.जुन्नर जि.पुणे
१३ क. ताराबाई हरिभाऊ तांबे
रा. जनता बँक समोर, ओतुर ता. जुन्नर जि. पुणे
१३ ब. रुक्मिणी विठ्ठल वेठेकर
रा. पिंपरी पेंढार, ता. जुन्नर, जि.पुणे. -- प्रतिवादी

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये,

उपविभागीय अधिकारी. जुन्नर - आंबेगाव उपविभाग मंचर त्यांचेकडील आरटीएस/अपिल २९८/२०१८ अन्वये दि.१३/०३/२०२४ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द वादी यांनी या न्यायालयात दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अपिलामध्ये मा. अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचे समोर दि.११/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी निश्चीत करण्यात आली आहे, तरी आपण आपले वकिलांसह तसेच आपलेकडील पुराव्याचे कागदपत्रांसह व सदरची नोटीस घेवून मा. अप्पर जिल्हाधिकारी, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.०१ वा मजला यांचे दालनात उपस्थित रहावे, अन्यथा आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन गुणवत्तेनुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. वादी यांनी, प्रतिवादी यांना अपिल अर्ज व त्यासोबत जोडलेले कागदपत्र उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.

(शिक्का)

सही -
अप्पर जिल्हाधिकारी, पुणे करिता

# मजेदार ड्रिंक ब्रँड मोगू मोगूची भारतात जागतिक मोहिम सुरू

*मोगू मोगूचा भारतातील Gen Z साठी संदेश आहे – कठीण आणि अवघड क्षण विसरून मजेत पुढे चला, कारण खऱ्या आयुष्यात 'स्किप बटण' नसतो!*




**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

आजची Gen Z पिढी इंटरनेटवर काहीही म्यूट, ब्लॉक किंवा स्किप करू शकते. पण खऱ्या आयुष्यात अशी कोणतीही सुविधा नसते. डिजिटल जगातील सहज अनुभव आणि दैनंदिन आयुष्यातील अवघड, टाळता न येणारे प्रसंग यातील हाच फरक लक्षात घेऊन मोगू मोगूने आपली नवीन जागतिक मोहीम "वाना स्किप? यू गॉटा च्यू" तयार केली आहे. ही मोहीम 1 जून रोजी सायंकाळी 6 वाजता भारतात सुरू होत आहे. या मोहिमेद्वारे Gen Z ला काल्पनिक 'स्किप बटण' विसरून मोगू मोगू च्या खास 'सिप अँड च्यू' अनुभवाचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही मोहीम थायलंड स्थित सॅप्पे पब्लिक कंपनी लिमिटेड (सॅप्पे) या कंपनीने तयार केली आहे. SAPPE ही मोगू मोगूची मूळ कंपनी असून 'स्नॅक ड्रिंक' या श्रेणीची निर्माती आहे. जगभरातील Gen Z तरुणांच्या अनुभवांवर केलेल्या संशोधनातून तीन सर्वात सामान्य आणि अवघड प्रसंग समोर आले. त्यामध्ये "द स्ट्रेंजर आइज़" (सार्वजनिक वाहतुकीत एखाद्या अनोळखी व्यक्तीसोबत नकळत होणारा नजरेचा संपर्क), "द थर्ड व्हील" (जोडप्यांसोबतच्या सहलीत एकटाच सिंगल व्यक्ती असणे) आणि "द फर्स्ट टिंडर डेट" (प्रोफाइलमध्ये दिसणारी व्यक्ती आणि प्रत्यक्षात भेटणारी व्यक्ती पूर्णपणे वेगळी असणे) यांचा समावेश आहे. याच प्रसंगांवर या मोहिमेची संकल्पना आधारित आहे. प्रत्येक परिस्थितीत मोगू मोगू हा एक मजेशीर उपाय म्हणून दाखवण्यात आला आहे मोहिमेचा संदेश सोपा आहे - "जर एखादा प्रसंग स्किप करता येत नसेल, तर तो मोगू मोगूचा (चघळत-चघळतच) च्यूई अनुभव घेत सहज पार करा."

चघळण्याची क्रिया शरीर आणि मनावरील ताण कमी करण्यास तसेच मूड सुधारण्यास मदत करते. त्यामुळे मोगू मोगूचे " टँजिबल फन" ही केवळ एक टॅगलाइन नाही, तर त्यामागे खरा अनुभव आहे. याच कारणामुळे ब्रँडने हा खास संदेश निवडला आहे: त्यामुळे त्या क्षणी उत्पादनाला आपले योग्य स्थान मिळते.

मोगू मोगूचे भारतातील वितरण भागीदार सनबीम व्हेंचर्सचे डायरेक्टर आणि फाउंडर विकाश सिंघल म्हणाले, "मोगू मोगूचे भारतात आधीपासूनच मोठ्या प्रमाणात चाहते आहेत. लीची, स्ट्रॉबेरी आणि ग्रेप हे फ्लेवर्स सातत्याने सर्वाधिक विकले जाणारे फ्लेवर्स आहेत. तसेच, नुकताच लॉन्च झालेल्या ब्लॅककरंट फ्लेवरलाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. ही मोहीम त्या लोकप्रियतेला एक नवी कथा देते. ऑनलाइन जगणाऱ्या पण प्रत्यक्ष आयुष्यातही अनेक प्रसंगांना सामोरे जाणाऱ्या तरुणांशी ही मोहीम त्यांच्या भाषेत आणि विनोदी पद्धतीने संवाद साधते. त्याचबरोबर उत्पादनही आपल्या संदेशाला न्याय देते."

भारतात ही मोहीम यूट्यूब आणि इन्स्टाग्रामवर राबवली जात आहे. Gen Z प्रेक्षकांपैकी 80 टक्क्यांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी इन्फ्लुएंसर कंटेंट आणि प्रमुख ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील विशेष प्रचार मोहिमांचाही वापर केला जाणार आहे. या मोहिमेसोबतच मोगू मोगूने भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा उत्पादन विस्तार जाहीर केला आहे.

मोगू मोगू कँडी आणि मोगू मोगू आइस टी ही नवीन उत्पादने प्रथमच भारतीय बाजारात उपलब्ध होणार आहेत. जागतिक स्तरावर ही मोहीम 100 हून अधिक देशांमध्ये एकाच वेळी सुरू होत आहे. त्यामुळे ही मोहीम मोगू मोगूच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि समन्वित जागतिक लॉन्चपैकी एक मानला जात आहे.

सॅप्पे पब्लिक कंपनी लिमिटेडचे सीईओ, पियाजित रुक्कारियापोंग म्हणाले, "Gen Z ही जगभरातील ट्रेंड ठरवणारी एक शक्तिशाली पिढी आहे. त्यांना नवे अनुभव, मजा आणि प्रामाणिकपणा खूप महत्त्वाचा वाटतो आणि मोगू मोगू हे चांगल्या प्रकारे समजते. "वाना स्किप? यू गॉटा च्यू" ही मोहीम यशस्वी ठरते कारण तिच्यामागील विचार खरा आणि वास्तवाशी जोडलेला आहे, तसेच उत्पादनही त्या अनुभवाला न्याय देते. आम्हाला ठाम विश्वास आहे की भारत हा या जागतिक विस्तारासाठी एक अत्यंत महत्त्वाचा बाजार आहे आणि आम्ही येथे दीर्घकालीन कामासाठी उभे आहोत."

जगातील पहिला नाटा डी कोको असलेला फळांचा ज्यूस ड्रिंक आणि भारतात 'स्नॅकेबल ड्रिंक' ही संकल्पना लोकप्रिय करणारे पहिले पेय म्हणून मोगू मोगू इतर पेयांपेक्षा वेगळा ठरतो. आज मोगू मोगू 100 हून अधिक देशांमध्ये वेगाने लोकप्रिय होत असून, उच्च गुणवत्ता आणि विविध फळांच्या फ्लेवर्ससाठी ओळखला जातो. भारतात मोगू मोगू हे मॉडर्न ट्रेड स्टोअर्स, किराणा स्टोअर्स तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर सहज उपलब्ध आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जप्त वाहनांचा ऑनलाईन ई-लिलाव 10 जून रोजी होणार

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड यांच्या वायुवेग पथकाने मोटार वाहन कायद्याअंतर्गत विविध गुन्ह्यांमुळे जप्त केलेली, तसेच मोटार वाहन कर न भरल्याने आणि संबंधितांनी हक्क सांगून न सोडवून घेतलेली एकूण ९३ वाहने ऑनलाईन ई-लिलावाद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत. ई-लिलाव १० जून २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत www.mstcindia.co.in या संकेतस्थळावर आयोजित करण्यात येईल. सदर वाहनांचा लिलाव 'भंगार' स्वरूपात करण्यात येणार असून, Registered Vehicle Scrapping Facility (RVSF) संस्थांना या लिलावात सहभाग घेता येणार आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेली सर्व वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड कार्यालयाच्या आवारात, राजगुरूनगर बस डेपो व मंचर बस डेपो येथे उपलब्ध असून इच्छुक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत प्रत्यक्ष पाहणी करता येणार आहे.



### थेरगाव येथे रस्ता रुंदीकरणासाठी अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा 'बुलडोझर'

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २४, मौजे थेरगाव येथील लेमनट्री हॉटेल ते मोरया बॅन्क्वेट हॉल दरम्यान सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण प्रकल्पाअंतर्गत अनधिकृत बांधकामांवर आज निष्कासनाची कारवाई करण्यात आली. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण ३० ठिकाणांवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे १ हजार ८५८.२५ चौरस मीटर क्षेत्रफळावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. ही कारवाई महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांच्या अधिपत्याखाली पार पडली. या कारवाईमध्ये उपअभियंता सुनील बेळगावकर व जयवंत रोकडे यांच्यासह महापालिकेच्या धडक कारवाई पथकातील 'ब', 'ड' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयांचे १४ बीट निरीक्षक सहभागी होते. तसेच ४० एमएसएफ जवान, १ पोलीस उपनिरीक्षक, ९ पोलीस कर्मचारी, १० कंत्राटी मजूर, ७ मजूर कर्मचारी आणि ५ जेसीबी यंत्रांच्या सहाय्याने ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. या कारवाईस शहरी दळणवळण विभाग, विद्युत विभाग, नगररचना विभाग तसेच इतर संबंधित विभागांचे सहकार्य लाभले.

### पिंपरी-चिंचवडमध्ये मोठ्या सोसायट्यांना CPCB नोंदणी बंधनकारक

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्या आणि आस्थापना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या सोसायटी व आस्थापनांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम 2026 अंतर्गत मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, मॉल्स, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मंगल कार्यालय, वसतीगृह, कॅण्टीन तसेच, व्यावसायिक आस्थापनांसाठी सीपीसीबीच्या पोर्टलवरील नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे. या माध्यमातून कचरा निर्मिती, विलगीकरण आणि प्रक्रियेवर केंद्रीकृत पद्धतीने देखरेख ठेवली जाणार आहे. सीपीसीबीचे केंद्रीकृत घनकचरा व्यवस्थापन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. सर्व पात्र बल्क वेस्ट जनरेटर्सनी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

### पिंपळे गुरवमध्ये पीएमपीएलचा नियोजनशून्य कारभार

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे गुरवमध्ये पीएमपीएल प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका हजारो प्रवाशांना बसत आहे. एका बाजूला लाखो रुपये खर्च करून उभारलेले सुसज्ज बसशेड धूळ खात पडून आहेत, तर दुसऱ्या बाजूला नागरिकांना भर उन्हात पदपथावर उभे राहून बसची वाट पाहावी लागत असल्याचे विदारक चित्र सध्या पिंपळे गुरव येथे पाहायला मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून बसमार्ग बदलल्याने प्रवाशांमध्ये तीव नाराजी व्यक्त होत आहे. आकुर्डी रेल्वे स्टेशन ते मनपा भवन, पिंपरी गाव ते मार्केट यार्ड, भोसरी ते भेकराईनगर, भोसरी ते कोथरूड डेपो, आळंदी ते म्हाळुंगे या विविध मार्गांवरील पीएमपीएल बसेस पूर्वी तुळजाभवानी मंदिराच्या अलीकडील मार्गाने जात, पिंपळे गुरव बसस्थानकाबाहेरील थांब्यावर थांबत होत्या. त्या ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी दोन-दोन बस शेडही उभारण्यात आले होते. मात्र, पीएमपीएल प्रशासनाने अचानक बसमार्गात बदल करत बसेस तुळजाभवानी मंदिराच्या पलीकडील बाजूने वळविल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.



# वास्तववादी कथेला प्राधान्य द्यावेत - अनंत महादेवन

**पिंपरी (दै. संध्या)**



तरुण निर्मात्यांनी चित्रपट निर्मिती करतांना ट्रेंड आणि अल्गोरिदमपेक्षा सत्य, मौलिकता आणि प्रभावी कथेची निवड करावी. चित्रपट सृष्टीत नव्या पिढीच्या लेखकांनी साचेबद्ध चौकटीत न अडकता मानवी जीवन रेखाटणाऱ्या वास्तववादी, कथेला प्राधान्य देवून, आपल्या कल्पकतेला चित्रपटाच्या माध्यमातून आपल्या जागतिक स्तरावर पोचवा. असे मत चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी व्यक्त केले.

येथील डी. वाय. पाटील एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन आणि सिम्प्लिफाय सक्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या टेडएक्स -डी वाय पी डब्ल्यू एस युथ-२०२६ कार्यक्रमात ते बोलत होते. आकुर्डीच्या डी.वाय. पाटील एज्युकेशन कॅम्पसच्या शांताई सभागृहात "उद्याचा आवाज" या संकल्पनेवर कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी अभिनेत्री अदिती पोहनकर,गायिका अन्वेशी जैन, बालाजी जयसीलन, दीपक वाणी, कर्नल मिकी ओबेरॉय, जुही दामोदर, मणी कंदन एम.एस, डॉ. अमित सुरतकर आदी मान्यवर उपस्थित होते. उद्याचा आवाज या थीमवर आयोजित कार्यक्रम आकुर्डी येथील डी वाय पाटील शैक्षणिक संकलातील शांताई सभागृहात संपन्न झाला. अदिती पोहनकर म्हणाल्या कि, कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी कष्टाला अध्यात्माची जोड द्यावी. वैयक्तिक विकास आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधत समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे अवाहन केले.

याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना, डी.वाय. पाटील एज्युकेशन अँड रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा डी.वाय. पाटील वर्ल्ड स्कूलचे अध्यक्ष डॉ. भरत पाटील यांनी तरुणांना आत्मविश्वासी नेतृत्व आणि नवनिर्माते बनवण्यासाठी सक्षम करण्याची गरज असल्याचे सांगितले. डी.वाय. पाटील वर्ल्ड स्कूलच्या संचालिका डॉ. श्वेता पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचारसरणी आणि जागतिक नागरिकत्वाची भावना रुजवण्यासाठी आमची शाळा कटिबद्ध असल्याचे अधोरेखित केले.

व्यासपीठावरील सर्व वक्त्यांनी आपल्या कल्पना, अनुभव आणि अंतर्दृष्टीच्या माध्यमातून उपस्थितांना प्रेरित आणि सक्षम बनवण्यात मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी बर्लीन पॅकेजिंग आणि प्रोकॉन्व्हिस यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पियुष शर्मा यांनी तर आभार डॉ. श्वेता पाटील यांनी मानले.

## यमुनानगरमध्ये पाणीपुरवठा व विद्युत वितरण विभागाचा भोंगळ कारभार; लाखो लिटर पाण्याची नासाडी

**पिंपरी (दै. संध्या)**



यमुनानगर परिसरात पाणीपुरवठा व विद्युत वितरण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे. विशेष म्हणजे, एकीकडे मोठ्या प्रमाणात पाणी गळती होऊन पाणी वाया जात असताना दुसरीकडे मागील तीन दिवसांपासून परिसरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने त्यांचे हाल होत आहेत. याचाच निषेध म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबा परब, मनोज लांडगे यांनी पाण्यात बसून आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

स्थानिक रहिवाशांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप केला जात आहे. पाणीटंचाईमुळे नागरिकांना पिण्याचे व दैनंदिन वापराचे पाणी मिळवण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाविरोधात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते बाबा परब, मनोज लांडगे यांनी पाण्यात बसून आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. "नागरिकांना पाणी मिळत नाही आणि दुसरीकडे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने याची दखल घेऊन समस्या सोडवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.

नागरिकांनीही पाणीगळती तात्काळ थांबवून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. आता प्रशासन या गंभीर समस्येकडे कितपत गांभीर्याने पाहते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिकेत विविध अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराचे वाटप

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता राखण्याच्या दृष्टीने विविध विभागांतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षाच्या प्रशासन अधिकारी उमा दरवेश यांच्याकडे स्थानिक संस्था कर विभागाच्या सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे प्रशासन अधिकारी गोरखनाथ लिमण यांच्याकडे ब क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. याशिवाय सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक दत्ता सूर्यवंशी यांच्याकडे क्रीडा विभागाच्या प्रशासन अधिकारी पदाचा तर स्थानिक संस्था कर विभागाच्या कार्यालय अधीक्षक सरिता मारणे यांच्याकडे फ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कामकाज सुरळीत, गतिमान आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी हे अतिरिक्त कार्यभार वाटप करण्यात आले असून, त्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

## विषारी दारुकांडाने हादरलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये खुलेआम गांजा विक्री; पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

**पिंपरी (दै. संध्या)**



विषारी दारुकांडामुळे राज्यभरात चर्चेत आलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात आता खुलेआम सुरू असलेल्या गांजा विक्रीचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे याबाबत पोलिसांना माहिती देऊनही तात्काळ कारवाई करण्यात टाळाटाळ झाल्याचा आरोप होत असून, पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

भाजपच्या नगरसेविका अर्चना करांडे यांचे पती अक्षय कारंडे यांनी या प्रकाराचा पर्दाफाश केला. निगडी प्रभागात फेरफटका मारत असताना त्यांच्या निदर्शनास एक महिला खुलेआम गांजा विक्री करत असल्याचे आल्याचे सांगितले जाते. यावेळी गांजा खरेदी करणाऱ्या व्यक्तीलाही त्यांनी पकडले. अक्षय करांडे यांनी संबंधित महिला आणि खरेदीदाराला रोखून धरत निगडी पोलिसांना तातडीने घटनास्थळी येण्याची सूचना दिली. मात्र बराच वेळ उलटूनही पोलीस घटनास्थळी पोहोचले नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच पोलिसांकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. फुगेवाडी-दापोडी येथील विषारी दारुकांडानंतर शहर पोलिसांवर मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्या घटनेतून धडा घेऊन अवैध धंद्यांवर कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असताना गांजा विक्रीसारख्या प्रकारांबाबत पोलिसांची उदासीनता कायम असल्याचे या घटनेतून समोर आल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

या प्रकरणामुळे शहरातील अवैध अमली पदार्थांच्या विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिस प्रशासनाने याबाबत कठोर आणि प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## मे महिन्यात पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने मे २०२६ या महिन्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात मोठी मोहीम राबवत तब्बल ६२ हजार ७२७ वाहनधारकांवर कारवाई केली आहे. या कारवाईतून सुमारे ६ कोटी ७६ लाख ३० हजार ९०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिक, व्यापारी आणि आयटी क्षेत्राचे प्रमुख केंद्र असल्याने येथे वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याने वाहतूक शाखेकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार तसेच पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर आणि अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत ही विशेष कारवाई करण्यात आली.



# पुनावळे येथे इंद्रधनू सप्तरंगी सेवा सोहळा उत्साहात संपन्न

**पिंपरी (दै. संध्या)**



लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ डी २, झोन ७ आयोजित इंद्रधनू सप्तरंगी सेवा सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी हॉटेल ब्लू वॉटर, पुनावळे येथे उत्साहात संपन्न झाला. लायन्स डिस्ट्रिक्ट गव्हर्नर एमजेएफ राजेश आगरवाल, लायन्स डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्रेयस दीक्षित, माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर बी. एल. जोशी, एम. सी. सी. लायन विजय सारडा, झोन चेअरपर्सन हिरामण राठोड आणि समन्वयक राजेंद्र काळे यांच्या प्रमुख उपस्थितीसह झोन ७ मधील अध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि सभासद यांची मोठ्या संख्येने सोहळ्यास उपस्थिती लाभली होती. आरोग्य, पर्यावरण, बालआरोग्य, दुर्धर व्याधी उपचार, शिक्षण, युवासक्षमीकरण आणि सामाजिक सेवाकार्य या सात आयामांसाठी २०२५ - २६ या कालावधीत झोन ७ मधील सात क्लबनी केलेल्या सेवाकार्याचा गौरव याप्रसंगी करण्यात आला.


दीपप्रज्वलन आणि माही बुटाला या युवतीने सादर केलेल्या गणेशवंदना नृत्याने सोहळ्याचा प्रारंभ करण्यात आला. हिरामण राठोड यांनी प्रास्ताविकातून लायन्स क्लब ऑफ पुणे भोसरी, चिंचवड रॉयल, पुणे मेट्रोपोलीस, पुणे आकुर्डी, पुणे इनोव्हेशन, पिंपरी डिजिटल आणि व्हिजनरी या झोन ७ मधील सात क्लबने केलेल्या विविध सेवाकार्याची माहिती दिली. यावेळी राजेश आगरवाल यांनी, 'झोन ७ मधील सेवाकार्य हे मानवंदना देण्याच्या योग्यतेचे आहे' , असे गौरवोद्गार काढले. श्रेयस दीक्षित आणि विजय सारडा यांनी प्रशंसापर शुभेच्छा व्यक्त केल्यात. यानिमित्त संपन्न झालेल्या स्नेहमेळाव्यात श्रवणीय चित्रपटगीतांच्या तालावर आणि आकर्षक वेषभूषेत युगुलनृत्य, समूहनृत्य, संपूर्ण कुटुंबाचे नृत्य, महिला समूहनृत्य सादर करण्यात आले. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आकाशवाणीवरील एकाच वेळी लागलेल्या चार रेडिओ स्टेशन्सच्या क्रास कनेक्शनमुळे उडालेल्या गोंधळाच्या विनोदी सादरीकरणाने सर्वांना मनसोक्त हसवले; तर स्वर्गीय आशा भोसले यांना श्रद्धांजलीनिमित्त सादर करण्यात आलेल्या दिलखेचक नृत्याविष्कारावर उपस्थितांनी ठेका धरला होता; तसेच एकल स्वरातील गीतगायनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. या मनोरंजनात्मक सादरीकरणात रॉयल क्लब ऑफ चिंचवडने प्रथम क्रमांक पटकावला. सोफिया जैन यांनी परीक्षण केले. मान्यवरांच्या हस्ते सेवाक्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्ती आणि क्लब यांना सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले; तसेच सोहळ्यासाठी सहकार्य आणि योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. प्रा. शैलजा सांगळे आणि शामकुमार माने यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र काळे यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकण नगरपरिषदेला भरीव निधी देऊ - दिलीप वळसे पाटील

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथे माजी विधानसभा अध्यक्ष तथा सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांनी चाकण नगरपरिषदेला भरीव निधी देण्याचे आश्वासन दिले. स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या चाकण येथील निवासस्थानी सहकार मंत्री वळसे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले. याप्रसंगी वळसे यांनी स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या राजकीय, सामाजिक व विकासाभिमुख कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या कार्याला उजाळा दिला. याप्रसंगी दिलीपराव वळसे पाटील यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांशी संवाद साधत विविध स्थानिक प्रश्नांवर चर्चा केली. विशेषतः शेतकरी हिताच्या दृष्टीने कांदा हमी भावाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. चाकण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी चाकण नगरपरिषदेला भरीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा सुरेशभाऊ गोरे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व चाकण नगरपरिषदेतील शिवसेनेचे गटनेते नितीन गोरे यांच्या हस्ते वळसे पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या सदिच्छा भेटीप्रसंगी सर्वपक्षीय पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आ. सोनवणे वाजगे पाटे यांच्या भेटीला

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्याचे विकास पुरुष आपला माणूस आमदार शरद दादा सोनवणे आपले सहकारी जुन्नर शिवसेना तालुका प्रमुख बाबुभाऊ पाटे यांचे वडील ज्येष्ठ शिवसैनिक बाळासाहेब पाटे व नारायणगावचे माजी उपसरपंच व नारायणगाव शिवसेना शहराध्यक्ष संतोष दादा वाजगे यांची खाजगी मध्ये त्यांच्या घरी जाऊन आपुलकीने तब्येतीची विचारपूस त्यांना धीर देऊन लवकर बरे होण्यासाठी आपुलकीने धीर देण्याचे काम केले. नेहमीच आपल्या कार्यकर्त्यांविषयी आस्था असणारे व्यक्तिमत्व शिवसेना हा एक परिवार आहे त्याचे आपण पालकत्व म्हणून असलेली त्यांची तळमळ नेहमी दिसून येते.

### रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी राजेंद्र जाधव

नारायणगाव (दैनिक संध्या) : सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या रोटरी इंटरनॅशनलच्या रोटरी क्लब ऑफ आळेफाटा-मेनच्या २०२५-२६ वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये रो. राजेंद्र जाधव यांची अध्यक्षपदी तर रो. शुभम ढमाले यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. रोटरी इंटरनॅशनलच्या 'Create Lasting Impact' या संकल्पनेनुसार शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकास क्षेत्रात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. समाजावर दीर्घकालीन आणि सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल विविध सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.त्यामध्ये अक्षय मंडलिक, मोहन जाधव,विकास मटाले, डॉ.प्रदीप गुंजाळ, डॉ.महादेव वाणी, ऋषी पोळ, गौरव बनकर, डॉ. अमोल डुंबरे,शिवाजी गोरे, जीवनभाऊ शिंदे, हरिषचंद्र वाघुले, सचिन डुंबरे, रोशन घुले, अॅड.अमित कुटे यांनी शुभेच्छा दिल्या.आगामी काळात क्लबच्या सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.



### खराबवाडीत गॅसचा अवैध साठा करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

चाकण (दैनिक संध्या) : चाकण लगतच्या खराबवाडी येथील जय गणेश भारत गॅस या वितरकावर पिंपरी - चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने सोमवारी केलेल्या धाडसी कारवाईत गॅसची अवैध साठवणूक आणि काळाबाजार करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर गॅस टाक्या हस्तगत केल्या. अधिक माहिती अशी की, गोपनीय माहितीच्या आधारे मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने खराबवाडी येथील जय गणेश भारत गॅस एजन्सीवर अचानक धाड टाकली. याठिकाणी केलेल्या तपासणीत पोलिसांना अनेक संशयास्पद बाबी आढळल्या. पोलिसांनी एकूण ८१ गॅस टाक्या ताब्यात घेतल्या. यामध्ये काही टाक्या पूर्ण भरलेल्या, तर काही अर्धवट भरलेल्या आहेत. एकूण ३०० ते ४०० किलो गॅसचा साठा पोलिसांनी हस्तगत केला आहे. सचिन प्रकाश म्हसकरे आणि कुणाल संतोष हजारे या दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. पिंपरी - चिंचवड आयुक्तालयाच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही धाडसी कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवाडकर, पांडुरंग देवकाते, पोलीस उपनिरीक्षक महेश खांडे, पोलीस अंमलदार गणेश सावंत, गणेश कोकणे, विनोद वीर, विशाल गायकवाड, अमर कदम व नितीन लोखंडे आदींनी या कारवाईत भाग घेतला होता. महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

### चाकण येथे शुक्रवारी नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान



चाकण (दैनिक संध्या) : पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चाकण येथे शुक्रवारी (दि.५) परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्यासह उपनगराध्यक्षा, गटनेते, नगरसेवक, नगरसेविका आदींचा सन्मान करण्यात येणार आहे.

# धर्मादाय सहआयुक्तांची जेजुरी गडावर पाहणी

## भंडारा सक्ती व आपत्कालीन मार्गाबाबत दिल्या सूचना

**जेजुरी (दै. संध्या)**

पुणे येथील धर्मादाय सहआयुक्त दिनेश कोठलीकर यांनी बुधवार दिनांक 3 रोजी जेजुरी गडावर भेट देत देवस्थान परिसराची पाहणी केली. यावेळी त्यांनी गडावरील विविध सुविधा, व्यवस्थापन व्यवस्था तसेच भाविकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेतला.भंडारा सक्ती आणि गडावरील आपत्कालीन मार्गाबाबत सूचना दिल्या.

जेजुरी गडावर पाहणीदरम्यान कोठलीकर यांनी पुजारी, देवस्थानशी संबंधित घटक आणि स्थानिक प्रतिनिधी यांची भेट घेतली. तसेच भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून प्राप्त झालेल्या विविध तक्रारी ऐकून घेत त्याबाबत चर्चा केली. विशेषतः भाविकांकडून भंडारा घेण्याची सक्ती होत असल्याच्या तक्रारींकडे त्यांनी गांभीर्याने लक्ष दिले. भाविकांना शुद्ध आणि दर्जेदार भंडारा उपलब्ध व्हावा यासाठी



आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. तसेच कोणत्याही भाविकावर भंडारा खरेदी करण्यासाठी किंवा घेण्यासाठी सक्ती होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

याशिवाय गडावरील आपत्कालीन मार्गाचीही पाहणी करण्यात आली. आपत्कालीन रस्त्याचा वापर केवळ गरज असलेल्या परिस्थितीतच करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या. अनावश्यक वाहन वाहतूक बंद ठेवून अत्यावश्यक सेवा, रुग्णवाहिका किंवा विशेष अडचणीच्या परिस्थितीतच वाहनांना प्रवेश देण्यात यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जेजुरी गडावरील व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुधारणा आणि उपाययोजना करण्यावर भर देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी श्री मार्तंड देवसंस्थान चे अध्यक्ष विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे, पांडुरंग थोरवे आदी उपस्थित होते.

## जेजुरी व परिसरात मान्सूनपूर्व पावसाची हजेरी

### गडाच्या पायऱ्यावरून धबधब्यासारखे वाहिले पाणी

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी आणि परिसरात सायंकाळी सहा वाजता जोरदार मान्सून पावसाने झोडपून काढले. जेजुरी गडाच्या पायरी मार्गावरून भंडारायुक्त पावसाचे पाणी धबधब्यासारखे वाहत होते. प्रचंड उष्णतेमुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे दिलासा मिळाला. जेजुरी व परिसराला मान्सूनपूर्व पावसाने हुलकावणी दिली होती. प्रचंड उकाड्यामुळे दैनंदिन जीवन हैराण झाले होते. नागरिक व शेतकरी मान्सून पूर्व पावसाच्या प्रतिक्षेत असताना बुधवार दिनांक 3 रोजी सायंकाळी सहा वाजता जोरदार पावसाला सुरवात झाली. अर्ध्या तासात सर्वत्र पाणीच पाणी झाले. जेजुरी गडावर पाऊस झाल्याने गडाच्या पायरी मार्गावरून धबधब्याप्रमाणे पाणी वाहू लागली. अचानक





आलेल्या पावसामुळे भाविकांची पळापळ झाली. वाल्हे, दौंडज वाड्या वस्त्या जेजुरी एम आय डी सी, व जेजुरीत ढगांचा गडगडाट व विजांसहित चांगला पाऊस झाला तर पश्चिम भागात पाऊस पडला नाही. जुनी जेजुरी परिसरात वादळ वाऱ्यामुळे अनेक घरांचे पत्रे उडून दुसरीकडे पडले. जेजुरी नगरपरिषदेच्या वेधशाळेत आज 23 मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

## CBSE ची धुरा लोखंडे साहेबांकडे!

**नारायणगाव (दै. संध्या)**

आपल्या जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावचे श्री.अरुणशेठ सुदामगुरुजी वेठेकर यांचे भाचे आणि केंद्रीय गृह मंत्रालयात अतिरिक्त सचिव म्हणून कार्यरत असलेले श्री.प्रशांत सिताराम लोखंडे साहेब यांची केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक उच्चपदाच्या निवडीसाठी मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा. नुकतेच CBSE च्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीतील तांत्रिक अडचणी व उत्तरपत्रिकांच्या अदलाबदलीसंबंधी घडलेल्या गंभीर घटनेनंतर केंद्र शासनाने या केंद्रीय शैक्षणिक संस्थेची महत्वाची जबाबदारी श्री. लोखंडे साहेबांकडे दिली आहे. केंद्रशासित प्रदेश केडरचे २००१ साली भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झालेल्या लोखंडे साहेबांनी त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीत सामान्य प्रशासनातील धोरणात्मक कामे यशस्वीपणे



पार पाडली आहेत. एक जुन्नरकर म्हणून आम्हाला अभिमान आहे की अशी प्रतिभावंत व कर्तबगार व्यक्ती आपल्यापैकी आहे. लोखंडे साहेबांचा प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव व नीतिमत्त्वामुळे CBSE मध्ये शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, शिस्त, सुव्यवस्था आणि तांत्रिक सुधारणांसाठी ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावून त्यांच्या नेतृत्वाखाली आपल्या भारत देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेत सुधारणा घडून, विद्यार्थ्यांसाठी अधिक पारदर्शक व विश्वासार्ह प्रक्रिया झाल्याशिवाय राहणार नाही, असा जुन्नरकरांना ठाम विश्वास आहे.

## 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी' अभियानाचा शुभारंभ!

**शिरूर (दै. संध्या)**

भावी पिढीला व्यसनाच्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी आणि एक निरामय, तणावमुक्त व सुदृढ समाज घडवण्यासाठी राजर्षी शाहू प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य,दक्ष मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य आणि जागृत शोध वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच शिरूर पोलीस ठाण्याच्या सहयोगाने एका भव्य मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. 'व्यसनमुक्त आणि तणावमुक्त महाराष्ट्र अभियान' अंतर्गत ब 'व्यसनमुक्तीची वारी आली आपल्या दारी' या विशेष जनजागृती अभियानाचा शानदार शुभारंभ ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय मा. श्री. अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते राळेगण सिद्धी येथे करण्यात आला.

हे अभियान शिरूर तालुक्यातील प्रत्येक गावागावांमध्ये पोहोचणार असून, ग्रामीण भागात या वारीला नागरिकांचा उत्तुंग प्रतिसाद मिळत आहे. प्रत्येक गावात जाऊन ग्रामस्थांना व्यसनमुक्तीची सामूहिक





प्रतिज्ञा दिली जात आहे. तसेच, संकटसमयी मदतीसाठी असलेल्या 'डायलब ११२' (Dial 112) आणि महिलांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असणाऱ्या 'दामिनी पथका'च्या कार्याबद्दल पोलिस उपनिरीक्षक दिलीप पवार मार्गदर्शन केले. तर व्यसनमुक्ती बाबत राजेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाबाबत अध्यक्ष भगवान श्रीमंदिलकर यांनी माहिती दिली या अभियानाची प्रमुख ५ पंचसूत्री उद्दिष्टे आहेत.1) व्यसनाधीन व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचे योग्य समुपदेशन करणे.२. शाळा-महाविद्यालयांतून व्यसनविरोधी व गुन्हेगारी प्रतिबंधक प्रबोधन करणे. ३.आरोग्य, योग आणि मानसिक स्वास्थ्य शिबिरांचे आयोजन.४. व्यसनमुक्तांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे.५. तरुणांना रोजगारक्षम बनवून विपरीत मार्गापासून रोखणे.

या अभियानात विविध शासकीय विभागाचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, ग्राम सखी, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील, सामाजिक संस्था, महिला बचत गट, शिक्षक, पत्रकार आणि स्थानिक गणेश मंडळे मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवणाऱ्या सर्व अंगणवाडी सेविका, ग्राम सखी, आरोग्य सेविका, सेवक,संस्था व शासकीय कर्मचाऱ्यांना प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येत आहे.


या प्रसंगी राजर्षी शाहू प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. भगवान श्रीमंदिलकर, शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मा संदेश केंजळे, पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, ग्रामीण रुग्णालय शिरूर (NCD क्लिनिक) चे समुपदेशक मा. राजेश जाधव, मा. बाबुराव पाचंगे, मछिंद्र जामदार, अशोक पवार, नगरसेविका सविता राजापूरे बळवंत कुंभार, विवेक जगदाळे, प्रकाश कुंभार सर,राणीताई कर्डीले, सविता बोरुडे, डॉ वैशाली साखरे, रेश्मा शेख, पत्रकार अर्जुन बढे , बबन वाघमारे यांच्यासह पोलिस कर्मचारी, नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

## नारायणगावात उपबाजाराचे शेड उद्‌ध्वस्त

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव परिसरात मंगळवारी दुपारी २ वाजता गारा आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले. अवकाळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजारातील धना-मेथी विक्रीसाठी उभारलेले शेड कोसळले. या दुर्घटनेत सुमारे ३८ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

पुणे-नाशिक महामार्गालगत १३ एकर जागेत धना-मेथी विक्रीसाठी हे शेड उभारण्यात आले होते. मंगळवारी दुपारी वादळी वाऱ्यासह अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण शेड कोसळले. या घटनेची माहिती मिळताच



बाजार समितीचे पदाधिकारी व संचालकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अवकाळी पावसात मार्केट शेड पडल्यानंतर सदर शेडच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. काही संचालकांनी या प्रकारच्या बांधकामाला सुरुवातीपासून विरोध दर्शविला होता. "वादळी वाऱ्यात शेड जमीनदोस्त" झाल्याने शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशातून उभारलेल्या ३८ लाख रुपयांच्या प्रकल्पाचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या धना-मेथी मार्केटच्या भवितव्याबाबत आता प्रशासन कोणती पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आम्ही विरोधक म्हणून नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हितासाठी या कामावर आक्षेप घेतला होता,असे माऊली खंडागळे यांनी सांगितले.

घटनेनंतर बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी नुकसानाबद्दल दुःख व्यक्त करताना सांगितले की, शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. धना-मेथी विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांनी पोलीस स्टेशनजवळील जुन्या बाजार समितीच्या आवारात आपला माल विक्रीसाठी आणावा, असे आवाहन त्यांनी केले. झालेल्या नुकसानीचा लवकरच पंचनामा करण्यात येणार आहे. तसेच तातडीने संचालक मंडळाची बैठक बोलावून पुढील कार्यवाही आणि नव्या नियोजनाबाबत निर्णय घेतला जाईल. या घटनेमुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आळंदीचे ओंकार कुलकर्णी ज्योतिष भूषण पुरस्काराने सन्मानित

**आळंदी (दै. संध्या)**

आळंदी येथील वेदमूर्ती ओंकार सुनील कुलकर्णी यांना वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठानच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या 'ज्योतिष भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्योतिष क्षेत्रातील अभ्यास, संशोधन व जनजागृतीबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्योतिषाचार्य लक्ष्मीकांत जोशी, डॉ. कुलभूषण मंगळे, वेदमूर्ती भूषण रमेश महाजन तसेच पंचांगकर्ते हर्षद महाजन यांच्या हस्ते कुलकर्णी यांना सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी



विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना ओंकार सुनिल कुलकर्णी म्हणाले, "ज्योतिष हे केवळ भविष्य सांगण्याचे माध्यम नसून भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण शास्त्र आहे. या शास्त्राचा सखोल अभ्यास करून समाजापर्यंत त्याचे शास्त्रोक्त ज्ञान पोहोचविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे. मिळालेला हा सन्मान माझी जबाबदारी अधिक वाढविणारा असून भविष्यातही संशोधन व जनप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवणार आहे." या पुरस्कारामुळे आळंदीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, विविध स्तरांतून कुलकर्णी यांचे अभिनंदन होत आहे.

# श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

**जुन्नर (दै. संध्या)**

बुधवार दि.०३ जुन २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. अधिक मास मधील संकष्टी चतुर्थीमुळे दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने सकाळी ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष अॅड.संजय ढेकणे व विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता नारायणगाव येथील सुदिप सुनिल कसाबे व किशोर शशिकांत खैरे यांनी ४ कॅरेट केळी व १ कॅरेट आंबे तसेच गोळेगाव येथील सचिन सदाशिव ताम्हाणे यांनी १ कॅरेट पेरु प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७



वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या.

अधिक मास मधील संकष्टी चतुर्थीमुळे दिवसभर भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अॅड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर शिरोली खुर्द येथील विघ्नहर ग्रुप यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक व जुन्नर परिसरातुन मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष अॅड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# शासकीय योजनांचा लाभ घ्यावा – मंत्री अतुल सावे

■ मुंबई (दै. संध्या)

वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळामार्फत वडार समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

राज्यातील वडार समाजाच्या प्रलंबित विविध मागण्यांवर चर्चा करण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीला आमदार अभिमन्यू पवार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील पदाधिकारी उपस्थित होते.



मंत्री अतुल सावे म्हणाले की, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत वडार समाजासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. समाजातील नागरिकांनी जनजागृती करून विद्यार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच राज्यातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या वसतिगृहांमध्ये वंचित घटकांसाठी आरक्षण उपलब्ध असून वडार समाजातील विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

वडार समाजातील बेघर कुटुंबांसाठी घरकुल योजनेच्या निधीत वाढ करणे, तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मिळणाऱ्या २.५ लाख रुपयांच्या अनुदानासोबतच, राज्याच्या कामगार कल्याण मंडळामार्फत पात्र बांधकाम कामगारांना नवीन घरकुलासाठी अतिरिक्त २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश मंत्री सावे यांनी दिले.

वडार समाजाचा पारंपरिक व्यवसाय दगडफोड, खाणकाम आणि मातीकामाशी संबंधित असल्याने जिल्हापरिषद, महानगरपालिका आणि पंचायत समिती स्तरावरील काही कामे समाजासाठी राखीव ठेवण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

पुणे महानगरपालिकेने वडार समाज सेवा संघ' यांना २० गुंठे जागेवर विद्यार्थ्यांसाठी भव्य वसतिगृह उभारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली. तसेच वडार समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे सुलभपणे मिळावीत यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश सामाजिक न्याय विभागाला देण्यात आले.

या बैठकीला इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या संचालिका सोनाली मुळे, अखिल भारतीय महाराष्ट्र वडार समाज संघटनेचे कार्याध्यक्ष पिराजी मंजुळे, भाजप भटके विमुक्त आघाडीचे सरचिटणीस रविंद्र शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## आदिवासी बांधवांना प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्यात यावी : बावनकुळे

■ मुंबई (दै. संध्या)

अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाट भागामध्ये प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्याचे निर्देश नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांतील सार्वजनिक आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी आयोजित बैठकीत देण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ही बैठक पार पडली.



सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत प्रलंबित आरोग्यविषयक प्रकरणावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाट भागामध्ये आदिवासी बांधवांना प्रभावी आरोग्य सुविधा पुरविण्यात यावी. याची खबरदारी घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या भागास नियमित भेटी देण्याचे निर्देश यावेळी महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले. नागपूर जिल्ह्यातील नरखेड येथील ग्रामीण रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनासाठी आवश्यक बांधकाम निधी उपलब्ध करण्यासह, कामठी येथील उपजिल्हा रुग्णालयास प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रस्तावावर या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा करण्यात आली. मौदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची रिकामी जागा नगर परिषदेस हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

## प्रमाणपत्रे देण्यासाठी व्यापक मोहीम राबविणार : अतुल सावे

■ मुंबई (दै. संध्या)

लातूर जिल्ह्यातील भटक्या-विमुक्त, मायक्रो ओबीसी तसेच इतर वंचित घटकांतील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा आणि त्यांना आवश्यक असलेली जात, रहिवासी व इतर शासकीय प्रमाणपत्रे वेळेत उपलब्ध व्हावीत, यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात यावी, असे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले. लातूर जिल्ह्यातील विमुक्त जाती-भटक्या जमाती, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि इतर वंचित समाजघटकांच्या विविध समस्यांबाबत मंत्री सावे यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, भटके-विमुक्त समाजाचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री अतुल सावे यांनी यावेळी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना वंचित समाजातील नागरिकांना शासकीय प्रमाणपत्रे आणि योजनांचा



लाभ मिळवून देण्यासाठी विशेष शिबिरे, जनजागृती मोहीम आणि प्रशासकीय समन्वयाच्या माध्यमातून प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. समाजातील कोणताही पात्र नागरिक केवळ कागदपत्रांच्या अभावामुळे शासनाच्या लाभांपासून वंचित राहू नये, यासाठी शासन सकारात्मक असून आवश्यक ते निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत समाज प्रतिनिधींनी वंचित घटकांतील अनेक नागरिकांना जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र आणि इतर आवश्यक कागदपत्रे मिळविताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. आवश्यक प्रमाणपत्रांच्या अभावामुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, आरक्षणाचा लाभ आणि इतर विकासात्मक उपक्रमांपासून अनेक कुटुंबे वंचित राहत असल्याचे त्यांनी सांगितले.

भटके-विमुक्त, मागासवर्ग समाज विकास चळवळीचे अभ्यासक अशोक निवृत्ती तांबे यांनी यावेळी सविस्तर भूमिका मांडताना, भटक्या-विमुक्त आणि मायक्रो ओबीसी समाजातील नागरिकांना त्यांच्या हक्काच्या योजना व सवलती सहानुभूतीपूर्वक आणि सुलभ प्रक्रियेद्वारे मिळवून देण्यासाठी शासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली. तसेच विद्यमान शासन निर्णयांमध्ये आवश्यक सुधारणा करून प्रमाणपत्र वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी संबंधित विषयावर नवीन शासन निर्णय जारी करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेला प्राथमिक मसुदाही बैठकीत सादर करण्यात आला.

## राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांचे लोकभवन येथे स्वागत

■ मुंबई (दै. संध्या)

म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग भारत दौऱ्यावर आले असून त्यांनी आज लोकभवन येथे भेट दिली. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांचे स्वागत केले. म्यानमार राष्ट्राध्यक्षांच्या सन्मानार्थ लोकभवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमृता फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांच्या समवेत त्यांचे शिष्टमंडळ आलेले आहे. त्यामध्ये राष्ट्रपती कार्यालयाचे केंद्रीय मंत्री खिन माउंग यी, परराष्ट्र व्यवहार मंत्री टिन माउंग स्वे,



■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

वित्त आणि महसूल मंत्री डॉ. कान झॉ, कृषी मंत्री मिन नाउंग, उद्योग आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास मंत्री डॉ. चार्टी थान, म्यानमारच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर डॉ. खिन नाइंग ऊ, संरक्षण दलातील लेफ्टनंट जनरल मो म्यिंट स्वे, राष्ट्रीय नियोजन, गुंतवणूक आणि परकीय आर्थिक संबंध मंत्री यू थंत सिन ल्विन, स्थलांतर आणि लोकसंख्या मंत्री डॉ. खाइंग खाइंग सो, वाणिज्य मंत्री मिन मिन आणि म्यानमारमधील भारताचे राजदूत झॉ ऊ यांचा समावेश आहे. कार्यक्रमास कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, भारताचे म्यानमारमधील राजदूत अभय ठाकूर, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, मरिटाईम एअर ऑपरेशन्सचे एअर ऑफिसर कमांडिंग एअर व्हाइस मार्शल प्रशांत शरद वडोदकर आदी उपस्थित होते.

## महाविद्यालयाचे बांधकाम ३० जुलैपर्यंत पूर्ण करा – मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा वेळेत उपलब्ध होण्यासाठी कोल्हापूर येथील नव्याने सुरू करण्यात आलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम ३० जुलैपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कोल्हापूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आमदार अमल महाडीक, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणूगोपाल रेड्डी, तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कोल्हापूर येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. या महाविद्यालयाच्या कायमस्वरूपी इमारतीचे बांधकाम प्रगतिपथावर असून विद्यार्थ्यांना आधुनिक व सर्व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे काम तातडीने पूर्ण करावे, तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## शालेय शिक्षण विभागातील विविध विषयांचा मंत्री दादाजी भुसे यांनी घेतला आढावा

### दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून पटसंख्या वाढविण्यावर भर देण्याचे आवाहन



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील जिल्हा परिषदांच्या अनेक शाळा ज्ञानदानाचे उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यांचा आदर्श घेऊन सर्वच शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्याबरोबरच विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यावर भर देण्याचे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. 2026-27 हे शैक्षणिक वर्ष सुरू होताना विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करणे तसेच विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी दर्जेदार गणवेश देणे यावरही त्यांनी भर दिला.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी आदी या बैठकीस उपस्थित होते. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, मागील वर्षी शाळा प्रवेशोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व पालकमंत्री, लोकप्रतिनिधी यांच्यासह शासकीय अधिकारी यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत केले. याही वर्षी विद्यार्थ्यांचे स्वागत त्याच जोमाने करण्यात यावे. शाळा सुरू होण्यापूर्वी परिसर स्वच्छतेचे योग्य नियोजन करावे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश दर्जेदार असावे. बालभारतीमार्फत 80 टक्के पुस्तके शाळांपर्यंत पोहोचली असून उर्वरित पुस्तके शाळा सुरू होण्यापूर्वी पोहोचतील याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

शाळांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच पिण्याचे पाणी, स्वच्छ स्वच्छतागृहे, शाळेची रंगरंगोटी, दुरुस्ती, विद्यार्थीनींसाठी पिंक रुमची व्यवस्था याबरोबरच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देण्याची सूचना मंत्री भुसे यांनी केली. जवाहर बालभवनप्रमाणे शाळांमधून कला, अभिनय, संगीत, वक्तृत्व आदी बाबींवर भर देण्यात यावा. शाळांच्या विकासासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीबरोबरच माजी विद्यार्थी संघाचे सहकार्य घेण्यात यावे, असे त्यांनी सांगितले. अंगणवाड्या जिल्हा परिषद शाळांच्या आवारात सुरू कराव्यात, यामुळे पुढे शाळांमधील विद्यार्थीसंख्या वाढण्यास मदत होईल, असे ते म्हणाले. शाळांमधून विद्यार्थी सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. दौंड तालुक्यातील गरदरेवाडी येथील शाळेचे उदाहरण देऊन अशा शाळांचा तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा इतर शाळांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन मंत्री दादाजी भुसे यांनी केले. शिक्षकांची पदे भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, शाळा समित्यांच्या सदस्यांनी नियमित बैठका घेऊन प्रभावी काम करावे, शिष्यवृत्ती परीक्षांचा निकाल वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी शाळांना नियमित भेट द्यावी अशा सूचनाही त्यांनी केल्या.



## जपान-भारत सहकार्य अधिक दृढ करण्यावर भर – प्रा. राम शिंदे

### सभापती राम शिंदे यांची जपानच्या वाणिज्यदूत साटो हितोमी यांनी घेतली सदिच्छा भेट

■ मुंबई (दै. संध्या)

भारत-जपान संबंध अधिक मजबूत करण्याची गरज असून भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या उद्दिष्टासाठी जपानसारख्या देशांशी आर्थिक, तांत्रिक व सामरिक सहकार्य महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. विधानभवनात सभापती प्रा. राम शिंदे यांची जपानच्या वाणिज्यदूत साटो हितोमी यांनी भेट घेतली. मुंबईतील जपानच्या वाणिज्य दूतावासचे उप-वाणिज्यदूत निशिओ यों, प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी (आयएफएस) स्वप्नील थोरात, विधिमंडळ सचिव (१) जितेंद्र भोळे, सचिव (२) मेघना तळेकर, सचिव (४) शिवदर्शन साठ्ये आणि सभापती यांचे सचिव पंडित खेडकर उपस्थित होते. सभापती प्रा. राम शिंदे यांनी जपानच्या विकासाचा आणि द्वितीय महायुद्धानंतरच्या पुनर्निर्माणाचा उल्लेख करत जपानच्या प्रगतीचे कौतुक केले. महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे नमूद करत त्यांनी राज्यात गुंतवणूक, उद्योग आणि रोजगारवाढीसाठी जपानी सहकार्याचे स्वागत केले. तसेच भारत आणि जपान यांच्यातील मैत्रीपूर्ण संबंध आगामी काळात आणखी बळकट होतील, असा विश्वास व्यक्त केला. पायाभूत सुविधा, उद्योग आणि विकास प्रकल्पांमध्ये जपानचे सहकार्य महत्वपूर्ण ठरत आहे. 'विकसित भारत २०४७'ची माहिती देत विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विकासाभिमुख धोरणांना गती दिली जात आहे. महाराष्ट्रातील गुंतवणूकक्षम वातावरणाचा तपशील मांडताना, अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी परिसरात जपानी कंपन्यांनी ५०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केल्याची त्यांनी माहिती दिली. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून देशाच्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा महत्त्वपूर्ण वाटा असल्याचे सभापती प्रा. शिंदे त्यांनी नमूद केले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## यू मिन आंग ह्लाईंग यांची गेट वे ऑफ इंडियाला भेट

मुंबई (दैनिक संध्या) : भारत दौऱ्यावर आलेल्या म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी आज मुंबईतील ऐतिहासिक गेट वे ऑफ इंडियाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत म्यानमारचे शिष्टमंडळ, तसेच ताज हॉटेलचे प्रतिनिधी आणि इतर संबंधित उपस्थित होते. राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी गेट वे ऑफ इंडियाची वास्तूरचना, ऐतिहासिक महत्त्व आणि त्यामागील वारसा याबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. भेटी दरम्यान राष्ट्रपतींनी या भव्य स्मारकाची बारकाईने पाहणी केली. गेट वे ऑफ इंडियाची वैशिष्ट्ये, बांधकामातील कलात्मकता; तसेच भारताच्या इतिहासातील स्थान याविषयी त्यांनी विशेष उत्सुकता दाखवली. गेट वे ऑफ इंडियाचा इतिहास आणि वास्तुशिल्पीय वैशिष्ट्ये जाणून घेताना ह्लाईंग यांनी गेट वे ऑफ इंडियाचे कौतुक केले. त्यांनी यावेळी विविध पैलूंची माहिती उत्सुकतेने समजून घेतली.

## कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई (दैनिक संध्या) : 'महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी' (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेमार्फत राबविण्यात येत असलेल्या 'अमृत पर्यटन' उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक व नवउद्योजकांसाठी उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योजक, व्यावसायिक तसेच इच्छुक युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी तसेच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने 'अमृत पर्यटन' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटन स्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने आणि पर्यटन व्यवसायांना नव्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## विमानतळाची पाहणी

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाची म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मिन आंग ह्लाईंग यांनी आज पाहणी केली. पाहणी दरम्यान त्यांनी विमानतळावरील प्रवाशी सोयी सुविधा, स्वयंचलित बॅग तपासणी यंत्रणा, जलद 'इमिग्रेशन' सुविधेसह सुरक्षा व्यवस्थेची विमानतळ अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. राष्ट्राध्यक्ष ह्लाईंग यांच्यासोबत म्यानमार राष्ट्रपती कार्यालयाचे केंद्रीय मंत्री खिन माउंग यी, वित्त आणि महसूल मंत्री डॉ. कान झॉ, कृषी मंत्री मिन नाउंग, उद्योग आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग विकास मंत्री डॉ. चार्टी थान, परराष्ट्र व्यवहार मंत्री टिन माउंग स्वे, म्यानमारच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर डॉ. खिन नाइंग ऊ, संरक्षण दलातील लेफ्टनंट जनरल मो म्यिंट स्वे, राष्ट्रीय नियोजन, गुंतवणूक आणि परकीय आर्थिक संबंध मंत्री यू थंत सिन ल्विन, स्थलांतर आणि लोकसंख्या मंत्री डॉ. खाइंग खाइंग सो, वाणिज्य मंत्री मिन मिन आदी यावेळी उपस्थित होते. राजशिष्टाचार अधिकारी दिलीप शेडमेखे, अदानी समूहाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विष्णू झा, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाचे पोलीस उपमहानिरीक्षक दीपक अग्रवाल हे अधिकारी देखील उपस्थित होते.

## वेतनवाढीबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी

मुंबई (दैनिक संध्या) : बिडी कामगारांच्या उपजीविकेचा प्रश्न गांभीर्याने घेतला पाहिजे. कामगारांचा उदरनिर्वाह या उद्योगावर अवलंबून असल्याने त्यांना योग्य न्याय मिळावा, तसेच त्यांच्या किमान वेतनात वाढ करण्याबाबत या क्षेत्राशी संबंधित उद्योजकांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले बिडी कामगारांच्या किमान वेतन व महागाई भत्त्याच्या प्रश्नासंदर्भात कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बीकेसी येथील कामगार भवनात बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस कामगार विभागाचे उपसचिव दिपक पोकळे, तसेच संबंधित अधिकारी, मालक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात योग्य नियोजन करा : तालुका कृषी अधिकारी

पुणे (दैनिक संध्या) : एल निनो या हवामानातील बदलामुळे आपल्या भागात पाऊस कमी जास्त पडणे, पावसाचा खंड पडणे आणि पावसाचे असमान वितरण होणे अशी शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. बियाणे उगवण, फुल फळ, धारणांबावर विपरीत परिणाम होऊन उत्पादनामध्ये होण्याची शक्यता आहे, एल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामात पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. कोरडवाहू शेती करण्याऱ्यांनी जमिनीची कमीत कमी हलवाहलव करून पेरणी करावी तसेच भारी मध्यम जमिनीत पेरणी रुंद सरी वरंबा पद्धतीने करणे, कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या पिकांना वा वाणांचा प्राधान्य देणे. लहरी हवामानात शेतीमधील जोखीम कमी करण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. जमिनीची जलधारणा क्षमता वाढवण्यासाठी मूळस्थानी जलसंधारण वा जलतारा-शोषखड्डे शेतामध्ये राबवावेत. पाणी व्यवस्थापन साठी ठिबक व तुषार सिंचन संचाचा वापर करणे, रासायनिक खतांवर पूर्णपणे अवलंबून न राहता सेंद्रिय, जैविक खताचा वापर प्रामुख्याने कीडरोग व्यवस्थापन एकात्मिक करावे. ७५-८५ मिलिमीटर पाऊस पडल्यानंतर पुरेशी ओल असताना पेरणी करणे. लहरी हवामानामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पिक विमा योजनेमध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. कृषी सल्ला, हवामान अंदाज, बाजारभाव साठी महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे महाविस्तार ॲप चा वापर करावा. एल निनो प्रभावापासून शेतकऱ्यांनी सावधानता बाळगून उपयोजना कराव्यात, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे.

### अनुदानित बियाणे वितरणासाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत अन्नधान्य, कडधान्य व तेलबिया पिकांच्या उत्पादन वाढीसाठी नवीन व अधिक उत्पादनक्षम वाणांच्या प्रसारासाठी खरीप हंगामात 'प्रमाणित बियाणे पुरवठा' हा घटक राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत बारामती तालुक्यात तूर, मूग, बाजरी, सोयाबीन, सूर्यफूल व भुईमूग या पिकांचे अनुदानित दरात बियाणे शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अथवा जवळच्या महा-ई-सेवा/सुविधा केंद्रामार्फत तातडीने ऑनलाइन अर्ज करावेत. बियाणे वाटप 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर करण्यात येणार असून अर्जासाठी फार्मर आयडी असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त एक हेक्टर क्षेत्रासाठी अर्ज करता येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

### बी.सी. ई.बी.सी. मुलींच्या शासकीय वसतिगृहाची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरु

बारामती (दैनिक संध्या) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बारामती येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास तसेच दिव्यांग व अनाथ विद्यार्थिनींना शासनाच्या नियमानुसार प्रवेश देण्यात येणार आहे. वसतिगृहातील प्रवेश गुणवत्ता व आरक्षणाच्या निकषांनुसार करण्यात येणार असून विद्यार्थिनींना विनामूल्य निवास, भोजन, बेडिंग साहित्य, स्टेशनरी तसेच निर्वाह भत्ता आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. इच्छुक विद्यार्थिनींनी सामाजिक न्याय विभागाच्या HMAS पोर्टल वर जाऊन ऑनलाइन अर्ज भरावेत. ऑनलाइन अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसह वसतिगृह कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या अधीक्षिका एस. बी. खारतोडे यांनी केले आहे.

### किल्ले रायगडावर दोन दिवसीय शिवराज्यभिषेक सोहळा रंगणार

पुणे (दैनिक संध्या) : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त, अखिल भारतीय शिवराज्याभिषेक समितीतर्फे दुर्गराज रायगडावर शुक्रवार (दि. ५) व शनिवार (दि. ६) दोन दिवसीय शिवराज्यभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी युवराज संभाजीराजे छत्रपती व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती उपस्थित राहणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही देश-विदेशातून लाखो शिवभक्त रायगडावर दाखल होणार असल्याने उत्सव समितीकडून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. हा सोहळा अत्यंत पारंपरिक आणि उत्साही वातावरणात पार पडणार असून, दोन दिवस विविध कीर्तन, भजन, पालखी सोहळा, ढोलवादन, लेझीम प्रात्यक्षिके, तलवारीचे प्रात्यक्षिके अशा विविध भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती, समितीचे उपाध्यक्ष अतुल चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# 'पुरंदर रिपोर्टर'चा पहिला वर्धापन दिन दिमाखात संपन्न

**सोमेश्वरनगर (दै. संध्या)**



सत्य, अचूक आणि वेगवान पत्रकारितेच्या बळावर अल्पावधीतच जनमानसात विश्वासार्ह ओळख निर्माण करणाऱ्या 'पुरंदर रिपोर्टर' व 'बारामती रिपोर्टर' या न्यूज चॅनलचा प्रथम वर्धापन दिन सोहळा निरा येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पत्रकारितेसोबत सामाजिक बांधिलकी जपत समाजातील वंचित घटकांसाठी राबविलेल्या उपक्रमांमुळे या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संभाजी होळकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप उपस्थित होते. मुंबई मार्केटिंग फेडरेशनचे उपाध्यक्ष श्याम काका काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना संजय जगताप यांनी, "पत्रकारितेतील नवा 'रिपोर्टर' म्हणून पुरंदर रिपोर्टरने अल्पावधीतच जनमानसात विश्वास निर्माण केला असून सामाजिक जबाबदारी जपत केलेले कार्य कौतुकास्पद आहे," असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच पत्रकारितेचे आद्यजनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

वर्धापन दिनानिमित्त सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत परिसरातील १० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या किराणा किटचे वाटप करण्यात आले. तसेच सोमेश्वर येथील दिव्यांग बांधव रविराज गिरी यांना उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमांचे उपस्थित नागरिकांनी विशेष कौतुक केले.

यावेळी समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विशेष गौरव करण्यात आला. 'पुरंदर रिपोर्टर आरोग्यमित्र २०२६' हा पुरस्कार लोणंद येथील प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. नितीन सावंत यांना प्रदान करण्यात आला. तसेच डिजिटल माध्यम क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'मराठी कॉर्नर' युट्यूब चॅनलचे संपादक शुभम पवार यांचा 'उगवता तारा' म्हणून सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी 'पुरंदर रिपोर्टर'चे संपादक विजय लकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. पहिल्याच वर्षात यशाची उंच भरारी घेतलेल्या 'पुरंदर रिपोर्टर'ने सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक पत्रकारितेचा संदेश देत नव्या वाटचालीची दिशा निश्चित केली.

एका वर्षाच्या कालावधीत निःपक्ष, लोकाभिमुख आणि जनहिताच्या पत्रकारितेच्या माध्यमातून 'पुरंदर रिपोर्टर' व 'बारामती रिपोर्टर' यांनी नागरिकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. वर्धापन दिन सोहळ्याला लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हीच त्यांच्या कार्याची मोठी पावती असल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

या सोहळ्यास माजी जिल्हा परिषद सभापती प्रमोद काकडे, दत्ताआबा चव्हाण, सोमेश्वरचे माजी चेअरमन शहाजी काकडे, राजवर्धन शिंदे, जिल्हा परिषद सदस्य करण खलाटे व प्राजक्ता दुर्गाडे, पंचायत समिती सदस्य दिग्विजय जगताप, बाबा चोरमले, सोमेश्वर कारखान्याचे संचालक सुनील भगत, शैलेश रासकर, लक्ष्मण गोफणे, माजी जिल्हा परिषद सदस्य विराज काकडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र जगताप, जेजुरी देवस्थानचे माजी अध्यक्ष अभी देवकाते, युवा नेते सनी देवकाते, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष युवराज खोमणे, दिलीप फरांदे, डॉ. वसंत दगडे, किशोर शेळके यांच्यासह पुरंदर, बारामती, खंडाळा व इंदापूर तालुक्यातील पत्रकार, विविध संस्थांचे पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मोठी स्वप्ने पाहा, सर्वांना सोबत घेऊन पुढे चला'

**पुणे (दै. संध्या)**




शिवसेना भवन येथे धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष आणि पुणे शहर शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'आनंद बाल शिबिर' उपक्रमात मंगळवारी शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सहभागी होत बालचमूंशी संवाद साधला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी यावेळी नृत्य सादर करून व ओरिगामी कलेतून साकारलेल्या विविध कागदी वस्तू भेट देत डॉ. गोऱ्हे यांचे स्वागत केले.

संवादादरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी मुलांना भविष्यात काय बनायचे आहे, अशी विचारणा केली असता एअर होस्टेस, डॉक्टर, कलेक्टर, वकील, पोलीस अधिकारी, सैनिक आणि व्यावसायिक होण्याची स्वप्ने मुलांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याबरोबरच पालक आणि शिक्षकांचे मार्गदर्शन ऐकण्याचा सल्ला दिला. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर राग मनात न ठेवता सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती जोपासावी, असेही त्यांनी सांगितले.

शिवसेना भवनात मुक्तपणे वावरणाऱ्या, खेळणाऱ्या आणि आनंदाने बागडणाऱ्या मुलांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर उत्साहाने फुलून गेला होता. लहान मुलांचे खेळ आणि शिबिरे हा धर्मवीर आनंद दिघे यांचा आवडीचा विषय असल्याची आठवण करून देताना डॉ. गोऱ्हे यांनी ठाण्यातील आनंदाश्रमाप्रमाणेच पुण्यातील शिवसेना भवनातही लवकरच मोफत स्पोर्ट्स लायब्ररी सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने पालकही उपस्थित होते. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी पालकांना मुलांसमोर मोबाईलचा अतिवापर टाळण्याचे आवाहन केले. मुलांसोबत प्रत्यक्ष संवाद वाढविणे आणि त्यांच्यासाठी वेळ देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला सुधीर कुरुमकर, वैभव वाघ, संदीप शिंदे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, डॉ. नीलम गोऱ्हे यांची सलग पाचव्यांदा विधान परिषद सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल शिवसेना भोर-मुळशी विधानसभेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाप्रमुख बाळासाहेब चांदेरे आणि महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख कांता पांढरे यांच्या हस्ते हा सत्कार झाला. यावेळी भोर-मुळशी विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रेमविवाहानंतर छळ वाढला; तरुणीने फिनेल पिऊन जीवन संपवले

**पुणे (दै. संध्या)**

प्रेमविवाह करून नव्या आयुष्याची स्वप्ने पाहणाऱ्या 20 वर्षीय तरुणीने कथित हुंड्याच्या छळाला कंटाळून टोकाचे पाऊल उचलल्याची धक्कादायक घटना पुण्यात उघडकीस आली आहे. विवाहानंतर पती आणि सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या मानसिक त्रासामुळे तरुणीने फिनेल प्राशन करून आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी आंबेगाव पोलिस ठाण्यात पती, सासू आणि नणंद यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत तरुणीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी वारंवार माहेरहून सोन्याचे दागिने आणण्याची मागणी करत तिचा छळ केला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पती अजित दशरथ पवार (वय 25) हा मूळचा लातूर जिल्ह्यातील असून सध्या पुण्यात वास्तव्यास आहे. वर्षभरापूर्वी त्याचा आणि संबंधित तरुणीचा प्रेमविवाह झाला होता. मात्र लग्नानंतर काही काळातच हुंड्याच्या मागणीवरून वाद सुरू झाल्याचे तपासात समोर आले आहे.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, पतीसह सासू अनुसया दशरथ पवार (वय 55) आणि नणंद अलका लहू जाधव (वय 30) यांनीही तरुणीचा मानसिक छळ केला. सततच्या त्रासामुळे नैराश्यात गेलेल्या तरुणीने फिनेल पिऊन आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## मुलानेच घेतला वडील अन् भावाचा जीव, दुहेरी हत्येने जुन्नर हादरला

**पुणे (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात एका कौटुंबिक वादाचे भीषण रूप समोर आले आहे. लग्नाच्या कारणावरून सुरू असलेल्या वादातून संतप्त झालेल्या मुलाने स्वतःच्या वडिलांसह सख्ख्या भावाचा खून केल्याची धक्कादायक घटना पारगाव तर्फे मढ येथील बागाडवाडीत उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार (२ जून) रात्री ते बुधवार (३ जून) सकाळी दरम्यान ही घटना घडली. बाबाजी जयराम मुकणे (वय ३२) याने आपले लग्न लावून दिले जात नसल्याच्या कारणावरून वडील जयराम महादू मुकणे (वय ६५) आणि भाऊ राजू जयराम मुकणे (वय ३०) यांच्याशी वाद घातला. हा वाद टोकाला गेल्यानंतर आरोपीने लाकडी चोपणीने दोघांवर हल्ला केला. या हल्ल्यात दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले. ही घटना लक्ष्मण गोविंद कदम यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी युवराज जयराम मुकणे (वय २७) यांनी ओतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आरोपी बाबाजी मुकणे याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम १०३(१) अंतर्गत दुहेरी हत्येचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## उच्च उत्पन्न गटातील १० हजारपेक्षा अधिक लाभार्थ्यांना नोटीसा

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानांमार्फत मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांवर प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. खेड तालुक्यातील १९४ स्वस्त धान्य दुकानांमधून लाभ घेणाऱ्या सुमारे १० हजार ८४७ लाभार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

या लाभार्थ्यांना ७ मेपासून धान्य वितरण बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली असून, त्यांनी आपला खुलासा सादर करावा, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी दिली आहे.



शासनाची मोफत धान्य वितरण व्यवस्था हि गोर गरीब, गरजू कुटुंबासाठी आधार देणारी ठरली असली तरी आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेले मोफत धान्याचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.शासनाने

मिशन सुधार कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या पडताळणीत आयकर विवरणपत्र (ITR) भरणारे, स्वतःच्या नावावर व्यावसायिक फर्म असलेले तसेच करदाते असलेल्या १० हजार ८४७ लाभार्थ्यांची नावे समोर आली. त्यानुसार संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

त्यापैकी,२१५ जणांनी खुलासे सादर केले असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक अधिकारी एम. ए.कुंभार यांनी दिली.

खेड तालुक्यात १९४ स्वस्त धान्य दुकानातून ६५हजार पेक्षा अधिक शिधाधारक संख्या असून त्यामध्ये केसरी कार्ड ६०७५१, अंतोदय ३२७१,तर शुभ्र कार्ड धारकांची संख्या १०२५ इतकी असून केसरी कार्ड धारकांना मानसी दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू तर अंतोदय लाभार्थीना २२किलो गहू,१३ किलो तांदूळ,देण्यात येतो.

शासनाच्या निकषांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा लाभ केवळ पात्र व गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचावा, यासाठी अपात्र लाभार्थ्यांची छाननी सुरू असून संबंधितांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांचे धान्य वितरण बंद करण्यात येणार आहे.

# भारतीय मजदूर संघाच्या संघर्षाला मोठे यश

## पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय

**पुणे (दै. संध्या)**




पुणे मेट्रो रेल प्रकल्पामध्ये कार्यरत असलेल्या हजारो कंत्राटी कामगारांच्या न्याय्य वेतनाच्या मागणीस अखेर यश मिळाले असून महाराष्ट्र राज्याचे मा. कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पुणे मेट्रोतील सर्व कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतनवाढ लागू करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हा भारतीय मजदूर संघाच्या सातत्यपूर्ण आणि संघर्षशील प्रयत्नांचा मोठा विजय मानला जात आहे.

पुणे मेट्रो रेल कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून कंत्राटी कामगारांना न्याय्य वेतन मिळावे, केंद्र शासनाच्या लागू असलेल्या वेतनश्रेणीनुसार वेतन देण्यात यावे तसेच विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यात यावेत यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. यासाठी शासन, कामगार आयुक्त कार्यालय, पुणे मेट्रो प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदार यांच्याशी अनेक बैठका, निवेदने व चर्चा करण्यात आल्या. या आंदोलनाचा निर्णायक टप्पा म्हणून दि. १६ एप्रिल २०२६ रोजी भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चामध्ये राज्यभरातील मोठ्या संख्येने कामगारांनी सहभाग घेतला होता. या व्यापक आंदोलनामुळे शासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधले गेले आणि त्यानंतर झालेल्या सकारात्मक चर्चांमधून आजचा ऐतिहासिक निर्णय शक्य झाला.

बैठकीदरम्यान केवळ वेतनवाढीच नव्हे तर थकीत वेतन फरकाची रक्कम (Arrears), वैधानिक सुविधांची अंमलबजावणी, कामगारांच्या सेवा अटी तसेच इतर प्रलंबित प्रश्नांबाबतही सकारात्मक चर्चा झाली. संबंधित प्रश्नांवर लवकरच कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. कामगारांच्या न्याय्य मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आणि प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल पुणे मेट्रो रेल कामगार संघ व भारतीय मजदूर संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मा. कामगार मंत्री ना. आकाश फुंडकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

या बैठकीस भारतीय मजदूर संघाचे अखिल भारतीय सचिव श्री. अनिल ढुमणे, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर, पुणे जिल्हाध्यक्ष श्री. अर्जुन चव्हाण, पुणे मेट्रो रेल कामगार संघाचे अध्यक्ष श्री. राम सुरवसे, सौ. निकिता दंडवते, कैलास मोरे, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष श्री. निलेश खरात, श्री. उमेश विश्वाद तसेच, पुणे मेट्रोतील कामगार पदाधिकारी उपस्थित होते. या बाबतीत पुणे मेट्रोतील सर्व कामगारांनी संघटित होऊन संघर्ष केला अशीच एकजूटीने पुढील काळात नोकरीत कायम सेवेत सामावून घेण्या बाबतीत प्रयत्नशील राहणार आहेत असे मनोगत अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सरचिटणीस व पुणे मेट्रो रेल कामगार संघ जनरल सेक्रेटरी सचिन मेंगाळे यांनी व्यक्त केले आहे.

भारतीय मजदूर संघाच्या नेतृत्वाखाली कामगारांच्या हक्कांसाठी सुरू असलेला हा संघर्ष पुढेही अधिक ताकदीने सुरू राहील, असे असा विश्वास सचिन मेंगाळे यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

